


# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526




https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१५८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.१७ जुलै २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## पंढरपुरात विठू नामाचा गजर : मुख्यमंत्र्यांनी पाऊस अन् शेतकरी सुखासाठी घातले साकडे

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक पंढरपूर**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात श्री विठ्ठलाची शासकीय महापूजा देखील संपन्न झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्निक ही शासकीय महापूजा पार पाडली. भाविकांची विक्रमी गर्दी, टाळ मृदुंगाचा जयघोष, भजन, हरिनामाच्या गजराने अवघी पंढरपूर नगरी दुमदुमून निघाली आहे.

दरम्यान आषाढी एकादशीनिमित्त यंदा विठ्ठल-रखुमाईच्या शासकीय पुजेचा मान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळाला. त्यांच्या सोबतच नाशिक जिल्ह्यातील बाळू शंकर अहिरे व आशा बाळू अहिरे या वारकरी दाम्पत्याला शासकीय महापूजेसाठी उपस्थित राहण्याचा मान मिळाला. अहिरे दाम्पत्य हे नाशिक जिल्ह्यातील अंबासन येथील रहिवासी आहे. हे दाम्पत्य गेल्या १६ वर्षांपासून अखंडपणे पंढरपूरच्या वारीत सहभागी होत वारी करत आहेत.आषाढी यात्रेनिमित्त पंढरपुरात भविकांची मांदियाळी बघावयास मिळत आहे. जवळपास १५ लाख भाविक पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपुरा दाखल झाले आहेत. चंद्रभागेच्या तिरावर स्नानासाठी पहाटेपासूनच भाविकांची गर्दी झाली आहे. विठ्ठलाची



शासकीय महापूजा संपन्न झाल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे आपल्या कुटुंबासोबत रुक्मिणीच्या पूजेला गेले. त्यांच्यासोबत मानाचे वारकरी अहिरे दाम्पत्य देखील होते. रुक्मिणी मातेला दुग्धाभिषेक मुख्यमंत्र्यांनी पूजा केली. प्रसाद म्हणून शिंदेंना श्रीफळ, तुळशी हार आणि विठ्ठल-रुक्मिणीची प्रतिमा देण्यात आली.

राज्यातील वारकरी, शेतकरी सुखी होऊ दे, चांगला पाऊस पडू दे, पिक चांगले येऊ दे, बळीराजाला सुखी-समाधानी राहू दे, असे साकडे आपण विठुरायाच्या चरणी घातल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांसोबत संवाद साधला.

### माझा शेतकरी सुखी-समाधानी राहू दे

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, यंदा पंढरपुरात विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. मोठ्या संख्येने वारकरी, बंधू-भगिणी दर्शनाला आले आहेत. राज्यातील कष्टकरी, शेतकरी आणि प्रत्येक घटकाला चांगले आणि सुगीचे दिवस येऊ दे, अशी प्रार्थना आपण विठुरायाच्या चरणी केल्याचं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### पालखी मार्गावर वृक्षारोपणचा सर्वांनी संकल्प करूया

वातावरणातील बदलामुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी 'एक वारकरी एक झाड' ही संकल्पना राबवून पालखी मार्गावर वृक्षारोपण करण्याचा सर्वांनी संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आणि महाराष्ट्र कला संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी' या आळंदी ते पंढरपूर पायी वारीच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.


### पंढरपुरात टोकन दर्शन व्यवस्था सुरू करणार

तिरुपती बालाजीच्या धर्तीवर पंढरपुरात टोकन दर्शन व्यवस्था सुरू करण्यात येईल. यामुळे पंढरपूरला विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना विठुरायाचे सुलभ आणि कमीत कमी वेळेत पदस्पर्श दर्शन घेता येईल. यासाठी राज्य सरकारकडून १०३ कोटी रुपयांचा निधी लवकरच देईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. महापूजा संपन्न झाल्यावर मंदिराच्या सभा मंडळात झालेल्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

## शंकराचार्य म्हणतात राजकीय पुढाऱ्यांनी धार्मिक बाबीत लुडबूड करु नये

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

उद्धव ठाकरे यांच्यासोबत मोठा विश्वासघात झाला आहे, याचे दुःख अनेक लोकांच्या मनात आहे. उद्धव ठाकरे जोपर्यंत पुन्हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर विराजमान होत नाही तोपर्यंत आमच्या मनातील दुःख दूर होणार नाही, अशी खंत ज्योतिर्मठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी व्यक्त केली होती. यानंतर यावरून राजकीय वर्तुळात अनेक प्रतिक्रिया उमटल्या. यानंतर पुन्हा एकदा शंकराचार्यांनी पंतप्रधान मोदी यांचे नाव घेत स्पष्ट शब्दांत भाष्य केले आहे.



मीडियाशी बोलताना शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी म्हटले आहे की, राजकारणी स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेत असतील, तर त्यांनी धर्माचे पालन करायला पाहिजे. धर्माचे मर्म जाणून घेऊन ते आचरणात आणणारेच खरे हिंदू असतात. धर्माचार्याने वेळोवेळी धर्माची व्याख्या करणे गरजेचे आहे, अन्यथा धर्माचार्याने त्याचे काम केले नाही, असे होईल. म्हणून वेळोवळी धर्माची व्याख्या करत असतो, असे शंकराचार्यांनी सांगितले.

### राजकारण्यांनीही विश्वासघातासारखे कार्य करणे योग्य नाही

माझे राजकारणाशी काही देणेघेणे नाही. पण राजकारण्यांनीही विश्वासघातासारखे कार्य करणे योग्य नाही. ज्यांनी उपकार केले, त्यांच्याच विश्वासघात करणे योग्य नाही. मी संन्यासी आहे. राजकीय भाष्य करणे टाळायला हवे, हे खरे आहे. परंतु, हाच नियम राजकीय पुढाऱ्यांना देखील लागू होतो. त्यांनीही धार्मिक बाबीत लुडबुड करता कामा नये, असे शंकराचार्य म्हणाले.

### नरेंद्र मोदी आमचे शत्रू नाहीत

नरेंद्र मोदी आमचे शत्रू नाहीत. नरेंद्र मोदी आले त्यांनी नमस्कार केला, त्यांना आम्ही आशीर्वाद दिला. आम्ही त्यांचे हितचिंतक आहोत. त्यांच्या हिताच्या गोष्टी आम्ही सांगत आहोत. जर त्यांच्याकडून चूक झाली तर आम्ही त्यांची चूक दाखवून देतो. पंतप्रधान मोदी मंदिरात येऊन प्राणप्रतिष्ठा करू लागले, तर माध्यमे त्याचे थेट प्रक्षेपण करतात. जर शंकराचार्य मंदिर आणि धर्माबाबत बोलले तर तुम्ही आम्हालाच उलट शिकवता. राजकारण्यांनी धर्मात हस्तक्षेप करणे बंद करावे आणि गॅरंटी देतो की, आम्हीही राजकारणाबाबत बोलणे बंद करू, असा शब्द शंकराचार्यांनी दिला.

## फडणवीस- अजित पवारांचे हेलिकॉप्टर भरकटले

### नेत्यांचा जीव टांगणीला, पायलटने प्रसंगावधान राखले दादा म्हणाले- माझ्या तर पोटात गोळाच उठला होता

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक गडचिरोली**

राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार व त्यांच्यासोबत असलेले उद्योग मंत्री उदय सामंत आणि पार्थ पवार नागपूर ते गडचिरोली हेलिकॉप्टर प्रवासात सुदैवाने बचावले आहेत. या घटनेनंतर अजित पवार यांनी प्रवासातला त्यांचा अनुभव सांगत माझ्या तर पोटात गोळा उठला होता. पण पांडुरंगाच्या कृपेने आम्ही सर्व सुखरुप खाली उतरलो.

**खराब हवामान, दृष्यमानता अत्यंत कमी**

खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर ढगांमध्ये भरकटले होते. खराब हवामानामुळे दृष्यमानता अत्यंत कमी झाली होती. हेलिकॉप्टर पायलटने मोठ्या कौशल्याने हेलिकॉप्टर जमिनीवर उतरवले. त्यामुळे सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.



काही काळ हेलिकॉप्टर भरकटल्याने आत बसलेल्या नेत्यांचा जीव मात्र टांगलीला लागलाला होता.

**पायलटने कौशल्य दाखवले अन् सर्व वाचले..!**

गडचिरोलीत या सर्व नेत्यांना खराब हवामानाचा फटका बसला होता. पण, सुदैवाने सर्वजण सुखरुप आहेत. हेलिकॉप्टर पायलटने यावेळी आपलं कौशल्य दाखवल्याचं सांगितलं जातं. त्याने सुखरूप हेलिकॉप्टर जमिनीवर उतरवले.

**कार्यक्रमात अजित दादांनी काय सांगितलं?**

तुम्हाला कल्पना नाही, भविष्यात किती मोठे बदल या भागात होतील. जेव्हा आम्ही येत होतो, खूप ढग होते. नागपूरातून उड्डाण केले तेव्हा बरे वाटत होते, मात्र गडचिरोलीजवळ आलो, हेलिकॉप्टर ढगात शिरले, तेव्हा माझ्या पोटात गोळा आला. मी इकडे तिकडे पाहत होतो.. सर्व घाबरून होतो, मात्र देवेंद्र फडणवीस निवांत होते. त्यांना म्हणालो पहा आपण ढगात जात आहोत. तेव्हा फडणवीस म्हणाले घाबरु नका माझे आजवर सहा अपघात झालेले आहेत. मला मात्र कधीही काही झाले नाही. मी हेलिकॉप्टरला असलो तर कधी ही काही होत नाही. आणि तसेच झाले आम्ही सुखरूप लँड झालो, असा किस्सा त्यांनी सांगितला अन् गडचिरोलीत सभेत एकच हशा पिकला.

## शिवरायांची वाघनखे उद्या महाराष्ट्रात पोहोचणार

### १९ जुलै रोजी साताऱ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत भव्य सोहळा



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजल खानाचा कोथळा काढला ती वाघनघे उद्या गुरुवारी विशेष विमानाने लंडनहून महाराष्ट्रात येणार आहेत. ही वाघनखे सर्वसामान्यांना पाहता यावीत यासाठी सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज प्राचीन वस्तू संग्रहालयात ठेवण्यात येणार आहेत.

शिवाजी महाराजांनी वाघनखांच्या मदतीने स्वराज्यावर चाल करून आलेल्या अफजल खानाचा कोथळा काढला होता. इतिहासातील ही घटना अंगावर शहारा आणणारी आहे. शिवरायांची ही वाघनखे ब्रिटनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमकडे असल्याचा दावा केला जातो. ही वाघनखे आता राज्य सरकार महाराष्ट्रात आणणार आहे. उद्या एका विशेष विमानाने ही वाघनखे महाराष्ट्रात पोहोचतील.

त्यानंतर ही वाघनखे साताऱ्यात आणली जाणार आहेत. ती तिथे हिंदवी स्वराज्याच्या सातारा या चौथ्या राजधानीतील छत्रपी शिवाजी महाराज प्राचीन वस्तू संग्रहालयात जनतेला पाहण्यासाठी ठेवली जाणार आहेत. यासाठी तिथे एक विशेष दालनही उभारण्यात आले आहे. या वाघनखांच्या स्वागतासाठी १९ जुलै रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एक सोहळाही आयोजित करण्यात आला आहे.

## राज्यपाल कोट्यातील १२ आमदारांची ऑगस्ट महिन्यात नियुक्ती होणार

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राज्यपाल कोट्यातील १२ आमदारांची ऑगस्टमध्ये नियुक्ती होणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. राज्यपाल कोट्यातील १२ आमदारांमुळे महाविकास आघाडी आणि राज्यपाल यांच्यातील वाद शिगेला पोहचला होता.खेर आता या विषयावर पडदा पडणार असं चित्र आहे. पुढील महिन्यात या आमदारांच्या नियुक्या होणार आहेत.

विधानपरिषदेत जास्तीत जास्त संख्याबळ करण्यासाठी सर्व रिक्त जागा भरण्याच्या हालचाली महायुतीकडून सुरू आहेत. राज्यातील राज्यपाल नियुक्त आमदारांच्या यादीबाबतचा घोळ गेल्या तीन वर्षाहून अधिक काळापासून असल्याचं दिसून येतंय.

राज्यात महाविकास आघाडी सरकरा सत्तेत आल्यानंतर त्यांनी तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना १२ सदस्यांची यादी पाठवली होती. पण राज्यपालांकडून या यादीला ना हिरवा कंदील देण्यात आला, ना यादी मंजूर करण्याबाबत कोणतंही भाष्य करण्यात आलं. या प्रकरणी राज्य सरकारने न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतरही राज्यपालांनी कोणताच निर्णय घेतला नव्हता.

राज्यात शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी महाविकास आघाडीने दिलेल्या १२ सदस्यांची यादी मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर शिंदे सरकारकडून नवीन यादी सादर करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्याचवेळी दुसरीकडे महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली. विधानपरिषदेतील सभापती पद रिक्त आहे. याबाबत लवकरात लवकर निवडणूक जाहीर करावी याबाबत विरोधी पक्ष आग्रही आहेत.

## राष्ट्रवादीमुळेच लोकसभा निवडणुकीत भाजपाला फटका, आरएसएसचा पुनरुच्चार

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार यांना सोबत घेण्याची काय गरज होती, असा प्रश्न राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुखपत्र असलेल्या संघाचे मुखपत्र असलेल्या 'ऑर्गनायझर'मध्ये करण्यात आला होता. आता त्यापाठोपाठ आरएसएसशी संबंधित एका मराठी साप्ताहिकातही याचीच री ओढली आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र भाजपाच्या खराब कामगिरीला अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेससोबतची युती कारणीभूत असल्याचे यात म्हटले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपाने 'अब की बार चारसौ पार'ची घोषणा दिली होती. पण प्रत्यक्षात भाजपाला अडीचशेही जागा जिंकता आल्या नाहीत. २०१४ आणि २०१९मध्ये स्पष्ट बहुमत मिळवणाऱ्या भाजपाला २४० जागा मिळाल्या. भाजपाने महाराष्ट्रातही 'मिशन ४५+' जाहीर केले होते. तिथे तर भाजपा आणि मित्रपक्षांचे पानिपत झाले. महायुतीला अवघ्या १७जागा मिळाल्या. त्यात भाजपाच्या नऊ जागा आहेत.आरएसएसचे आजीव सदस्य रतन शारदा यांनी संघाचे मुखपत्र असलेल्या 'ऑर्गनायझर' या साप्ताहिकातील लेखातून भाजपा नेत्यांना लक्ष्य केले होते. भाजपाच्या पराभवाला त्यांचेच राजकारण कारणीभूत ठरले आहे, असे सांगताना रतन शारदा यांनी महाराष्ट्राचे उदाहरण दिले. महाराष्ट्रात भाजपा आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांचे बहुमत असलेले सरकार असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार यांना सोबत घेण्याची काय गरज होती, असा सवाल रतन शारदा यांनी केला होता.

## अखेर प्रकाश आंबेडकर यांच्या भूमिकेवर मनोज जरांगे यांनी मौन सोडलं, फडणवीसांवरही घणाघात

**दि. १७ विदर्भ प्रजासत्ताक जालना**

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीवर टीका केली. प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे यांच्या सगेसोयरे मागणीवर टीका केली. तसेच सरकारकडून नोंदी शोधून ज्यांना नवे ओबीसी प्रमाणपत्र दिले जात आहेत ते रद्द करावेत, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत. याशिवाय प्रकाश आंबेडकर ओबीसी, एससी आणि एसटी आरक्षणाच्या बचावासाठी राज्यात आरक्षण बचाव यात्रा काढणार आहेत. प्रकाश आंबेडकर यांच्या या भूमिकेवर मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. आम्ही त्यांना एक महिन्याचा वेळ दिला होता. आमच्यावर आता येत्या २० जुलैला आमरण उपोषण करण्याची वेळ आलेली आहे. ते उपोषण कठोर करणार आहोत, अशीदेखील भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी मांडली.



मराठा समाजाला गोडगोड बोलायचं हा देवेंद्र फडणवीस यांचा दुसरा डाव दिसतो. ओबीसी नेते मराठा समाजाच्या अंगावर घालायचे, देवेंद्र फडणवीस सारख्या एवढ्या मोठ्या नेत्याने इतके छिचोरे चाळे का करायला पहिजे? महाविकास आघाडीची आणि महायुतीची बैठक लावली होती, तेव्हापासून सगळे विरोधात बोलायला लागले. फडणवीस साहेब, तुम्ही नेमका तोडगा काढण्यासाठी बैठक बोलावली होती की प्रत्येकाला मराठ्यांविषयी द्वेष ओकायला लावताय? कारण प्रकाश आंबेडकर साहेब प्रत्येक वेळी मार्ग सांगायचे, तुम्हाला सलाईनमधून औषध घालतील, असं ते सांगायचं. पण तेच आज विरोधात बोलत आहेत. इतकं शोकिंग वाटतंय. आंबेडकर साहेब पण म्हणाले, सगे सोयऱ्याची अंमलबजावणी करू नका, त्यांचा पक्ष म्हणतो की नोंदी रद्द करा. मराठ्यांची एससी, एसटीच्या आरक्षणाची मागणीच नाही, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली.

## संपादकीय ......

# हिमालयातील बर्फ आटतोय

हिमालयाच्या वितळणार्या बर्फापासून निर्माण होणार्या पाण्यावर अवलंबून असलेल्या नागरिकांना यंदा पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. हवामान बदलामुळे हिमालयात बर्फाचे प्रमाण कमी राहिले असून, त्यामुळे पाण्याची कमतरता जाणवू शकते, असे शास्त्रज्ञांनी म्हटले आहे.

शास्त्रज्ञांच्या मते, यावर्षी हिमवृष्टी कमी झाल्याने हिमालयाच्या पर्वतरांगा पुरेशा प्रमाणात बर्फच्छादित झाल्या नाहीत. मागच्या आठवड्यात जारी केलेल्या अहवालात म्हटले आहे की, वितळणार्या बर्फापासून १२ प्रमुख नद्यांना पाणी मिळते. नद्यांच्या एकूण पाण्यापैकी एक चतुर्थांश स्रोत बर्फाच्या पाण्याचा आहे. यांचा उगम हिमालयातून होतो. अहवालाचे लेखक शेर मोहंमद यांच्या मते, बर्फ कमी झालेले प्रमाण देशाच्या धोरणकर्त्यांना आणि नदीच्या खालच्या भागात राहणार्या समुदायासाठी धोक्याची घंटा आहे. शेर मोहंमद हे नेपाळ येथील इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माऊंटने डेव्हलपमेंटमध्ये (आयसीआयएमओडी) काम करतात. त्यांच्या मते, बर्फ कमी होत असल्याने आणि त्याचे प्रमाण कमी–जास्त राहत असल्याने पाण्याची टंचाई निर्माण होण्याचा धोका राहू शकतो. प्रामुख्याने यावर्षी त्याची तीव्रता अधिक जाणवू शकते.

'आयसीआयएमओडी'च्या मते, हिमालयातील बर्फ हा या भागातील सुमारे २४ कोटी नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत आहे. याशिवाय खालच्या भागात खोर्यातील सुमारे १ अब्ज ६५ कोटी लोकांसाठीही हा स्रोत महत्त्वाचा मानला जातो. वास्तविक दरवर्षी बर्फाचे प्रमाण कमी–जास्त होत राहते; मात्र शास्त्रज्ञांच्या मते, हवामान बदलामुळे पावसाचे वेळापत्रक बदलले आहे आणि हवामानाच्या स्वरूपातही फरक जाणवत आहे. या अहवालात 'स्नो पर्सिस्टेन्स' म्हणजे बर्फ जमिनीवर राहण्याचा काळाचे आकलन केले आहे. यावर्षी हिंदकुश आणि हिमालयाच्या भागात त्याचे प्रमाण सामान्य स्तरांच्या सुमारे पाचपट कमी झाले आहे. यावर्षी बर्फ हा सामान्य पातळीच्या १८.५ टक्के तुलनेत कमीच राहिला आहे. गेल्या २२ वर्षांतील हा दुसरा नीचांक आहे. २०१८ च्या कमी राहणार्या बर्फाने १९ टक्क्यांपर्यंतची नीचांकी पातळी गाठली होती. या तुलनेत यंदा थोडा अधिक बर्फ राहिला आहे. नेपाळव्यतिरिक्त अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, चीन, भारत, म्यानमार आणि पाकिस्तानसारख्या देशांतही 'आयसीआयएमओडी'चे सदस्य आहेत. या अहवालात म्हटले आहे की, पाण्याच्या प्रवाहाचा काळ आणि वेग यात बदलाचे संकेत मिळत आहेत.

गेल्या शंभर वर्षांत पृथ्वीचे तापमान सरासरी ०.७४ टक्क्याने वाढले आहे; मात्र हिमालयाच्या भागात जागतिक सरासरीपेक्षा अधिक वेगाने तापमान वाढलेले दिसून येते. जून २०२३ च्या अहवालात म्हटले आहे की, हवामान बदलामुळे या शतकाच्या शेवटी हिंदुकुश, हिमालय भागात हिमकड्यांची/ हिमनद्यांची (ग्लेसियर) व्याप्ती ७५ टक्क्यांपेक्षा कमी राहू शकते. त्यामुळे या भागात राहणार्या सुमारे २४ कोटी नागरिकांना धोकादायक पुराचा सामना करावा लागू शकतो आणि त्यांना पाण्याची टंचाई जाणवू शकते. एव्हरेस्टवरून पतरणार्या गिर्यारोहकांनी पर्वतरांगा या कोरड्या आणि ओक्याबोक्या वाटू लागल्याचे मत मांडले आहे.

# सावधान, हवामानात होतोय बदल

# तूर-कपाशीची अशी घ्या काळजी

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक धाराशीव–** खरीप हंगामात सुरुवातीलाच चांगला पाऊस झाला. त्यामुळे सध्या खरीप हंगामातील तूर, उडीद, मूग, कपाशी, सोयाबीन ही पिके जोमात आहेत. त्यातच आता हवामान अंदाजानुसार पुढील काही दिवस आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याचीही शक्यता आहे. सध्या हवामानात होणाऱ्या बदलानुसार किडीपासून संरक्षणासाठी तूर, कपाशीची कशी काळजी घ्यावी, याबाबत माहिती दहिगावने (ता. शेवगाव, जि. धाराशिव ) कृषी विज्ञान केंद्राचे पीक संरक्षण विशेषतज्ज्ञ एम. पी. लाखे यांनी दिली.




## तुरीवर वांझ रोगाचा प्रादुर्भाव?

तूर पिकावर सुरुवातीच्या काळात वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिसतो. अशावेळी रोगट झाडे उपटून टाकावीत. वांझ रोगाचा प्रसार रोखण्यासाठी पीक २० व ४० दिवसांचे असताना सल्फर ५० टक्के (डब्ल्यू. पी.) ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी अथवा निमऑइल ४० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## रोप मर, मूळ खोड कुजला काय कराल?

रोप मर किंवा कोरडी मूळ खोड कूज आढळून येत असल्यास रोगट झाडांना बोर्डो मिश्रण १० टक्क्यांची आळवणी करावी किंवा ट्रायकोडर्मा आणि सुडोमोनस २ किलो प्रत्येकी २० ते २५ किलो चांगले कुजलेल्या शेणखतात मिसळून प्रतिएकर रोपाच्या बाजूने ४ ते ६ इंच अंतरावर दूर अळी करून घालावे. मावा फुलकिडे या सारख्या रस शोषण करणाऱ्या किडीच्या नियंत्रणासाठी निमार्क ५ टक्क्यांची फवारणी द्यावी.

## कपाशी बांधावर तणनाशक फवारणी टाळा

ज्या ठिकाणी वेळेत पेरणी झाली आहे त्या पिकात फांद्या फुटण्याची अवस्था सुरू झाली आहे. या काळात पिकात पाण्याचा ताण टाळण्यासाठी कुळवणी करून मातीची भार द्यावी, ज्या ठिकाणी अतिरिक्त पाणी साचत असेल तिथे निचऱ्याची व्यवस्था करावी. ईआजूबाजूच्या शेतात किंवा बांधावर तणनाशक फवारणी टाळावी. ज्या ठिकाणी बियाणाची उगवण झाली नसेल तेथील नांगे भरून घ्यावेत.

## फुलकिडीचा प्रादुर्भाव वाढीची शक्यता

कोरड्या हवामानात फुलकिडीचा प्रादुर्भाव वाढू शकतो, त्यासाठी फ्लोनिकॅमीड ५० डब्ल्यू. जी. २ ग्रॅम किंवा निंबोळी अर्क ५० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी घ्यावी.

शेतामध्ये पिवळे निळे चिकट सापळे २० ते २५ प्रतिएकर प्रमाणे लावावेत.

ओल असेल तर शेताच्या भोवती मका, झेंडू, चवळी एक आड एक दोन ओळीमध्ये लावून द्यावे.

## उन्हाळी कपाशीसाठी गंध सापळे

उन्हाळी कापशी पाते फुलाच्या अवस्थेत आहे. तेथे शेतात गुलाबी बोंड अळीसाठी गंध सापळे एकरी ८–१० या प्रमाणत लावावेत. शेताच्या अवत भोवती झाडे नसतील तर २०–२५ पक्षी थांबे उभारावेत. आकस्मिक रोप मर आढळून येत असल्यास बोर्डो मिश्रण १० टक्क्यांची आळवणी द्यावी.

त्यापाठोपाठ १.५ किलो युरिया व १.५ किलो पालाश १०० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी.

# रानडुकरांच्या दहशतीपासून, पिकांच्या संरक्षणासाठी हे जबरदस्त उपाय कराचं, वाचा सविस्तर

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक –** सध्या लागवडीचा काळ असून अनेक भागात पिकांनी जमिनीतून माना वर काढल्या आहेत. या दिवसात तसेच इतर वेळी डुकरांचा हैदोस पाहायला मिळतो. उभ्या पिकात डुकरे हिंडत असल्याने शेतीचे मोठे नुकसान होते. अशावेळी हे उपाय नक्कीच फायदेशीर ठरणार आहेत. पिकांच्या संरक्षणासाठी नेमके उपाय आहेत, ते पाहुयात....

### पारंपारिक पद्धती

**स्थानिक डुकरांच्या शेणाचा वापर–** स्थानिक डुकरांच्या शेणापासून तयार केलेले द्रावण पिकांच्या सभोवताली एक फुट अंतरावर टाकून मातीत मिसळणे. त्यामुळे रानडुकरांना त्या शेणाचा वास येऊन दुसरेच रानडुक्कर शेतात प्रवेश करत आहेत असे वाटते. व रानडुक्कर शेतात घुसणार नाहीत. दर सात दिवसाच्या अंतराने असे केल्यास रानडुकरांपासून नुकसान कमी होते.

**श्वसन निवारक म्हणून मानवी केसांचा वापर**

असमाधानकारक विकसित दुपटी असल्याने वन्य डुक्कर हालचाली करण्याकरता ते नाक जमिनीवर घासून इंद्रियांद्वारा वास घेत आपला मार्ग शोधत असतात. त्यामुळे बरेच शेतकरी मानवी केसांचा वापर रानडुकरांची दिशाभूल करण्यासाठी वापरतात. ही एक कमी खर्चाची पारंपरिक पद्धत आहे. रानडुक्कर आपले नाक जमिनीवर गाजते व मानवी केस नाकात गेल्यामुळे वन्य डुक्कर चिडतात आणि मोठ्याने आवाज करतात. त्यामुळे इतर रानडुकरांना सुद्धा धोक्याचे संदेश जातो. व ते पिकाकडे येत नाहीत यामुळे ७० ते ८० टक्के नुकसान ठरते.

**स्थानिक डुकरांच्या गौऱ्या जाळणे :** स्थानिक डुकरांचे वाळलेले शेण एका मातीच्या भांड्यात घेऊन जाळावे व चार–पाच ठिकाणी धूर करावा. त्या धुराच्या वासाने रानडुक्कर स्थानिक डुकरांचे कार्यक्षेत्र आहे, असे समजून पाहून जातात.

**ड्रम वाजवणे/ फटाके फोडणे :** हा उपाय सामुदायिक रित्या केल्यास जास्त परिणामकारक दिसतो. आवाज करणे, घंटा वाजवणे, फटाके वाजवणे, आरोळ्या देणे, इत्यादी प्रयत्न करून नुकसान कमी करता येते. ऑटोमॅटिक घड्याळे पण येतात, ते लावूनही सतत आवाज करता येतो.

**स्थानिक कुत्र्यांचा वापर :** स्थानिक कुत्रे पाळून त्यांना शिकवुन डुकरांना पळून लावण्यासाठी वापर केला जातो. ही पद्धत देखील शाश्वत आहे.




### पर्यावरण पूरक उपचार

**जैविक कुंपण यांचा वापर**

जसे की घायपात, करवंद, काटेरी, निवडुंग, झुडपे, तुती लागवड, बोर वापरून संरक्षणात्मक वापर करता येतो.

भुईमूग पिकात सीमा पीक म्हणून करडईच्या २–३ लाईन टाकल्यास दाट पेरा केल्यास त्याचा उग्र वास व काटेरी पानांमुळे आज प्रवेश करण्यास अडचण निर्माण होते. मका पिका भोवती एरंडीच्या दोन रांगा दाट लावल्यास रानडुक्कर मका वासानुसार ओळखतात. एरंडीच्या पानात अल्कोलाईट व ग्लुकोसाइड उच्च मात्र असल्यामुळे मका पीक ओळखू शकत नाही. शिवाय एरंडी उत्पादनाचाही फायदा मिळतो.

**अंड्यांची फवारणी करणे :** वन्य डुक्कर वासाने पीक ओळखतो. त्यामुळे २० मिली लिटर पाणी मिसळून पिकाच्या सभोवताली अंडी रस दोन ओळीवर अथवा मातीवर फवारणी केल्यास नैसर्गिक गंध निर्माण होतो. डुकरे परावर्तित होतात.

**काटेरी तारेचे कुंपण :** शेतामध्ये तीन रांगेत काटेरी तारांच्या करावे जमिनीपासून एक फूट उंचीवर पहिली लाईन घ्यावी. दुसरी दीड फूट व तिसरी दोन फूट अशी चार ते पाच फूट उंचीमुळे रान डुक्कर व इतर जनावरांपासून सुद्धा संरक्षण होते. ही खर्चिक पण कायमशिवाय प्रभावी पद्धत आहे. लोखंडी बाहेरच्या गोल कड्या पण करता येतात.

**सौर विजेचे कुंपण :** ही पद्धत हल्लीच्या काळात लोकप्रिय होत आहे. ही कायमची व्यवस्था आहे. सौर कुंपणात १२ वोल्ट वीज निश्चित ठेवण्यात येते. वीज पॅनल बसून तारात पाठवली जाते. या तारेला स्पर्श केल्यास शॉक बसतो. परंतु प्राणी हत्या घेत होत नाही व प्राणी येणे नक्कीच बंद होते. घाबरून इतरही प्राणी येत नाही.

**खड्डा पद्धत :** पिकाच्या शेता भोवताली २ १/२ फूट रुंद व दोन फूट खोल खड्डा घेतल्यास डुक्कर व इतर प्राणीही आत येऊ शकत नाही, नुकसान टळते. तसेच या माध्यमातून जलसंधारणाचे काम होते. जमिनीही चिवड होत नाही. दर दोन–तीन वर्षानंतर दुरुस्ती घ्यावी लागते.

### इतर अन्य उपाय

**थिमेट फॉरेस्ट दाणेदार कीड नाशकाचा वापर**

पॉलिथिन बॅगला दोन–तीन छिद्र करून २०० ग्रॅम थिमेट अधिक एक किलो रेती मिश्रित करून दोन–तीन ठिकाणी शेताच्या धुऱ्याकडे ठेवावा. असे शेताच्या सर्व बाजूने करावे. वाऱ्याच्या झोताने थिमेटचा उग्रवास जातो व रानडुकराला हा वास सहन होणार नाही.

**नारळ दोरी :** गंधक अधिक डुक्कर तेल मिश्रणात नारळ दोरी मिसळून लावल्यास उग्र वास येतो दहा दिवसांनी परत बुडवावे. तसेच शेती भोवताली (केळी, द्राक्ष), पिकांच्या सभोवताली रंगीत साड्या बांधल्यास डुकरांना भीती निर्माण होते, मात्र हा खर्चिक उपाय आहे. शिवाय रिफ्लेक्टिव्ह रिबन लावल्यास हवेने डोळ्यांवर प्रकाश येतो व पट्ट्या आवाजही करतात.

**संकलन : डॉ. पी. एस. जोशी**
सेवानिवृत्त सहाय्यक संचालक,
रामेती, छत्रपती संभाजीनगर




## रोज खा ४ पैकी १ पदार्थ, चष्मा लागणार नाही–डोळ्यांचा नंबर वाढण्यापूर्वी व्हा जाग

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक** सध्या लोकांमध्ये स्क्रीन टायमिंगचे प्रमाण वाढले आहे (एूश लरीश ढळीी). कामामुळे लोकांना लॅपटॉप किंवा संगणकावर तासंतास स्क्रीनसमोर बसून काम करावे लागते. ज्यामुळे डोळ्यांचे विकार वाढतात शिवाय नजर देखील कमजोर होते. कधीकधी तासभर स्क्रीन पाहण्याने डोळ्यात पाणी येते. याशिवाय डोळेही थकलेले दिसतात.



८ तास स्क्रीनसमोर काम केल्याने डोळ्यांना विश्रांती मिळत नाही. ज्यामुळे चष्म्याचा नंबर वाढतो किंवा ज्यांना चष्मा नाही त्यांची नजर धूसर होत जाते. डोळ्यांची नजर साफ आणि तेज करण्यासाठी आपण काही पदार्थांचा आहारात समावेश करू शकता. याने नक्कीच फरक दिसेल.

डोळ्यांसाठी कोणते पदार्थ बेस्ट

**बदाम–** डायटीशियन मनप्रीत यांनी सांगितले की, बदाम डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. रोज सकाळी भिजलेले ५ बदाम खावेत. यामध्ये व्हिटॅमिन ई आणि ओमेगा– ३ फॅटी सिड असतात. जे डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतात. आपण संत्री देखील खाऊ शकता. संत्रीमध्ये व्हिटॅमिन सी असते. जे ज्यामुळे डोळ्यांजवळील रक्तवाहिन्या निरोगी राहतात.

**गाजर–** गाजरमध्ये असलेले व्हिटॅमिन ए आणि बीटा कॅरोटीन दृष्टी सुधारण्यासाठी मदत करते. रेटिनाच्या वाढीस मदत करते. जर आपली दृष्टी कमकुवत होत असेल तर, आहारात गाजराचा समावेश करा. गाजरात असलेले व्हिटॅमिन सी मॅक्युलर डिजेनेरेशन कमी करून डोळे दीर्घकाळ निरोगी ठेवण्यास मदत करते.

**आवळा–** तीक्ष्ण दृष्टीसाठी आवळा खाण्याचा सल्ला दिला जातो. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी आणि इतर अँटीऑक्सिडंट्स असतात, ज्यामुळे दृष्टी तीक्ष्ण होण्यास मदत होते.

**किवी–** किवीमध्ये व्हिटॅमिन सी आणि ई असतात. जे डोळ्यांचे रक्षण करते. शिवाय डोळ्यांच्या आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते. याचे इतरही आरोग्यदायी फायदे आहेत. यामुळे इम्युनिटीही बुस्ट होते, आणि डोळ्यांच्या निगडीत आजार दूर राहतात.

# शेती पिके व फळबागांच्या उत्पादनासाठी मधमाशापालन

# खादी व ग्रामोद्योग विभागातर्फे ५० टक्के अनुदान

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** परागीभवनाव्दारे शेती पिके व फळबागांच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी मधमाशापालन अत्यंत उपयुक्त शेतीपुरक व्यवसाय असून यासाठी खादी व ग्रामोद्योग विभागातर्फे ५० टक्के अनुदान उपलब्ध आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत मधकेंद्र योजना संपूर्ण राज्यात कार्यान्वित झालेली आहे. या योजनेतंर्गत मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण साहित्य स्वरुपात ५० टक्के अनुदान ५० टक्के स्वगुंतवणूक शासनाच्या हमी भावाने मधखरेदी, तसेच विशेष प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. या योजनेंतर्गत वैयक्तिक मधपाळ हा साक्षर असावा, स्वत:ची शेती असल्यास प्राधान्य वय १८ वर्षापेक्षा जास्त आवश्यक आहे.

तसेच केंद्रचालक प्रगतीशील मधपाळ याची पात्रता किमान १० वी पास वय २१ वर्षापेक्षा जास्त अशा व्यक्तीच्या नावे किमान १ एकर किंवा त्या व्यक्तीच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावे किमान १ एकर शेती जमीन किंवा भाडे तत्वावर घेतलेली शेत जमीन असावी व लाभार्थ्याकडे मधमाशापालन प्रजनन मध उत्पादनाबाबतीत लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता व सुविधा असणे आवश्यक आहे. केंद्रचालक संस्था नोंदणीकृत असावी संस्थेच्या नांवे अथवा भाडे तत्वावर घेतलेली किमान १००० चौ. फुट सुयोग्य इमारत असावी.



संस्थेकडे मधमाशापालन, प्रजनन व मध उत्पादनाबाबतीत लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.मध उद्योगाचे प्रशिक्षणाकरीता अर्ज महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ व्दारा जिल्हा उद्योग केंद्र कॅम्प या पत्यावर अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी अमरावती यांनी केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# अमरावती शहराची लोकसंख्या दहा लाख; 'ट्रॅफिक सिग्नल' केवळ पाच !

## महानगरात प्रमुख ४० चौक; वाहतुकीची वाताहत, नव्याने २५ चौकात सिग्नलची गरज



**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – पश्चिम विदर्भातील सर्वांत मोठे शहर आणि विभागस्तरावर नावलौकिक असलेल्या महानगराची वाहतूक कोंडीमुळे वाट लागली आहे. महानगराची सुमारे दहा लाख लोकसंख्या असताना वाहतूक नियंत्रण करणारे केवळ पाचच 'ट्रॅफिक सिग्नल' सुरू असल्याची बाब पुढे आली आहे. त्यामुळे नव्याने २५ चौकात सिग्नलची गरज भासू लागली आहे.

विदर्भात नागपूर आणि अमरावती हे प्रादेशिक जिल्हे असून, विभागाची प्रमुख शहरे मानली जातात. नागपूर शहराने विकासाची कात टाकली आहे. वाहतूक आणि रस्ते नियोजनात नागपूर आघाडीवर आहे. मात्र, विकासात्मकदृष्ट्या अमरावती शहर प्रचंड माघारले आहे. एक मॉडेल स्टेशन वगळता औद्यागिक, शैक्षणिक आणि दळणवळणाच्या बाबतीत अमरावतीची वाट लागली आहे. अमरावतीत विकासाच्या नियोजनाचा अभाव हे महत्त्वाचे कारण दिसून येते.शहराची लोकसंख्या वाढल्यामुळे आयुक्तालय निर्माण करण्यात आले. त्यामुळे पोलिसांना बळ मिळाले. मात्र, येथील अंतर्गत वाहतूक ही वाहनधारकांसाठी सर्कस ठरली आहे. शहरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसल्याने ऑटोरिक्षांची संख्या विदर्भात प्रथम क्रमांकाची आहे. एका प्रवाशाकरिता अनेक ऑटोरिक्षा उभे येऊन ठाकतात. महत्त्वाच्या चौकात वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब आहे.

### या चौकात हवे नवीन 'ट्रॅफिक सिग्नल'

अमरावती महानगरात वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाला काही ठिकाणी नवीन 'ट्रॅफिक सिग्नल' निर्माण करणे गरजेचे आहे. यात गांधी चौक, जवाहर गेट, ईतवारा बाजार, नवाथे चौक, सरोज चौक, जयस्तंभ चौक, गोपालनगर डी मार्ट चौक, यशोदानगर, दस्तुरनगर, मोतीनगर चौक, मध्यवर्ती बसस्थानक, अमरावती रेल्वे स्थानक चौक, कॉटन मार्केट चौक, वडाळी ऑक्सिजन पार्क, सुंदरलाल चौक, चपराशी पुरा, रहाटगाव रिंग रोड, नवसारी रिंग रोड, कठोरा नाका ट्रॅव्हल्स पॉईंट, विदर्भ महाविद्यालय, कॅम्प चौक, विलासनगर, राजापेठ, चांदणी चौक, फरशी स्टॉप यासह बडनेरा जुनी वस्ती तसेच अकोला- यवतमाळ मार्गावर टी पॉईंट या ठिकाणी स्वयंचलित ट्रॅफिक सिग्नल लावणे काळाची गरज झाली आहे.

### या चौकात बंद आहेत सिग्नल

बस स्थानक, रुक्मिणीनगर, जिल्हाधिकारी कार्यालय चौक, रहाटगाव रिंग रोड बियाणी चौक , चपराशीपुरा चोंक शहरातील अनेक महत्वपुर्ण ठिकाणी वाहतूक नियमनासाठी ट्रॅफिक सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. काही ठिकाणी ब्लिकर्स लावण्यात आली आहेत. शाळांसह काही ठिकाणी सिग्नल नसले तरी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक पोलीस तैनात असतात.

**– संजय अढाऊ,** वाहतूक पोलिस निरिक्षक

### पाच 'ट्रॅफिक सिग्नल' सुरू पण केवळ १६ सेकंद

शहरात किमान ४० चौक आहेत. या सर्व चौकांमध्ये सकाळ, सायंकाळी वाहतुकीची प्रचंड कोंडी होते. वाहतूक नियंत्रणासाठी किमान २८ चौकात 'ट्रॅफिक सिग्नल' आवश्यक आहेत. असे असले तरी पंचवटी चौक, ईर्विन चौक, गर्ल्स हायस्कूल चौक, राजकमल चौक, शेगाव नाका या पाच ठिकाणी 'ट्रॅफिक सिग्नल' आहेत.त्यातही राजकमल चौकातील सिग्नल केवळ १६ सेंकदच राहतो त्यामुळे सिग्नलवर पोहचण्यासाठी अनेक वाहक घाई करतात त्या सिग्नल ची वेळ किमान ६० सेकंद करणे गरजेचं आहे.

# रोजगार हमी योजनेची मजुरी थकीत

## कुशल व अकुशलाची देयके कोट्यवधीच्या घरात



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक चिखलदरा,-** चिखलदरा तालुक्यात रोजगार हमी योजनेची कुशल व अर्धकुशल कामे मोठ्या प्रमाणावर झालीत पण कुशल देयके वर्षभरापासून तर अर्धकुशल देयके होळी पासून थकीत झाल्यामुळें मजुरांची उपासमार होत आहे याकडे शासनाने त्वरित लक्ष देऊन मजुरांची मजुरी अदा करावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

मेळघाटात रोजगार हमी योजनेची मजुरी मजुरांना होळी पूर्वी मिळाली होती त्यातही ज्या मजुरांची मजुरी बँके मार्फत होते असे मजूर एनपीसिएलच्या विळख्यात अटकलेच आहेत त्यांना वर्ष होऊनही मजुरी मिळाली नाही अशातच मेळघाटात रोजगार हमी योजना अंतर्गत वयक्तिक लाभाच्या योजना जसे की गुरांचा कोठा, शेतातील विहिरी, वृक्ष लागवड सारख्या योजनेत शेतकऱ्यांनी विहरी तसेच गुरांचे गोठे बांधून वर्ष होत आले तरी त्यांना कुशल बिले मिळाली नाहीत त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे आधीच घरातील सोनं नाने गहाण करून किंवा सावकाराकडून कर्ज काढून विहरी व गोठ्याचे बांधकाम केले आज मिळेल, उद्या मिळेल या आशेने गोठ्याचे बांधकाम केलीत सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांचे कमिशन देऊन बिल बनवलीत,जी एस टी टॅक्स लावून बिले जोडली मोजमाप पुस्तिका पंचायत समिती कार्यालयात बिल सादर करून ऑनलाईन केलीत या संपूर्ण प्रक्रियेला एक वर्ष पूर्ण होत आले तरीही शासन कुंभाकर्णी झोपेत आहे.

माझं गुरांचा गोठा बांधकाम करण्याला आज एक वर्ष पूर्ण झाले आहे गोठ्याच्या बांधकाम करण्यासाठी नातेवाईककाकडून पैसे आणलेत व बांधकाम केला पण मला अद्यापही गोठ्याचे बिल मिळाले नाही असे चीचखेडा येथील लाभार्थी दशरथ अजनेरिया, माया घोरपडे, गंगाराम गायन, रवींद्र गायन व श्रवण नागले यांनी सांगितले.केंद्र शासनाकडून आपण १२० कोटींची मागणी केली आहे पण अद्यापही निधी आला नाही अमरावती जिल्ह्याला वयक्तिक लाभार्थ्यांचे कुशल निधी १५ ते २० कोटी रुपये पाहिजे तसेच ज्यांचे १०० दिवस पूर्ण झालेली आहेत अशांची अर्ध कुशल मजुरी सुद्धा आलेली नाही असे अमरावती जिल्ह्याचे रोजगार हमी योजनेचे जिल्हा एमआयएस समन्वयक घुगे यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा लाभ घ्या; जिल्हाधिकारी यांचे आवाहन

## शैक्षणिक पात्रतेनुसार ६ हजार, ८ हजार आणि १० हजार प्रतिमाह विद्यावेतन

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन नोकरी मिळण्याची त्यांची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. यासाठी १२ वी पास प्रशिक्षणार्थींना ६ हजार, आयटी आय/पदविका ८ हजार आणि पदवीधर/पदव्युत्तर प्रशिक्षणाथ्या ना १० हजार प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे. या योजनेचा युवकांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे ही योजना राबविण्यात येत आहे.योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना, उद्योजका कडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणसाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निम शासकीय आस्थापना, उद्योग, महामंडळ या मध्ये मंजूर पदाच्या ५ टक्के इतके उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी घेता येतील. आस्थापना किंवा उद्योग



यांनी त्यांच्याकडील कार्यरत मनुष्यबळाची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in वेबपोर्टलवर अचूक दर्शविणे आवश्यक राहील. या योजनेकरिता उमेदवारांची नोंदणी, आस्थापनांची नोंदणी, कार्यप्रशिक्षण व्यवसाय नोंदणी, उपस्थिती नोंदविणे, विद्यावेतन अदा करणे, प्रशिक्षण रुजू व समाप्ती अहवाल, अनुभव प्रमाणपत्र इ. बाबी ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. तसेच बारावी, आय. टी. आय.. पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवांनी ऑनलाईन नोंदणी वेबपोर्टलवर करावी. लघु आणि मध्यम व मोठे उद्योग, स्टार्टअप्स, सहकारी संस्था, शासकीय, निमशासकीय आस्थापना, महामंडळ, सामाजिक संस्था आणि विविध आस्थापना इ. यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदवावे. किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्य प्रशिक्षणासाठी सहभागी होण्या साठी पात्र असतील.प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थीची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना किंवा उद्योग यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. सदर ऑनलाईन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थी चे विद्यावेतन प्रशिक्षणार्थी च्या थेट बँक खात्यात(ऊइढ) ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट देवून सदर योजनेमध्ये सहभागी व्हावे. तसेच आपल्या कडील मंजूर मनुष्यबळाच्या संख्येच्या तुलनेत जिल्ह्यातील उमेदवारांना कार्य प्रशिक्षणाची (खपींशीपहळ) संधी देवून त्यांना रोजगारक्षम होण्यास सहकार्य करावे. अधिक माहितीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजक मार्गदर्शन केंद्र, शासकिय तांत्रिक विदयालय परिसर, उस्मानिया मस्जिद जवळ, बस स्टॅण्ड रोड, अमरावती येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा. या योजनेचा जास्तीत-जास्त लाभ उमेदवारांनी आस्थापनांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# उपायुक्त माधुरी मडावी यांनी केली महात्मा फुले मार्केट परिसराची पाहणी



**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** शहरात पावसाने जोरदार हजेरी लावली असून शहरातील विविध परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी संबंधित महानगरपालिकांनी हालचाली सुरू केल्या आहेत. शहरात ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचते अशा ठिकाणांचा अभ्यास करुन या ठिकाणी कायमस्वरुपी तोड़गा काढ़ण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी दिले. या अनुषंगाने दिनांक १६ जुलै,२०२४ रोजी गांधी चौक येथील महात्मा फुले मार्केट व परिसरातील नाल्यामध्ये पाणी साचले असून त्याची पाहणी उपायुक्त माधुरी मडावी यांनी केली. या पाहणी दरम्यान सहा आयुक्त भुषण पुसतकर, उपअभियंता प्रमोद इंगोले, प्रभागाचे अभियंता लक्ष्मण पावडे, बाजार व परवाना अधिक्षक उदय चव्हाण, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ निरीक्षक धनिराम कलोसे, मनपा कर्मचारी उपस्थित होते. गांधी चौक येथील महात्मा फुले मार्केट व परिसरातील नाल्यामध्ये पाणी साचल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारींचे निराकरण महानगर पालिके मार्फत करण्यात आले. सदर तक्रारीवर प्रभागक्षेत्र अधिका-यांनी मनपा कर्मचा-यांमार्फत साचलेल्या पाण्याची विल्हेवाट लावण्याची कारवाई केली. नालीत पाणी अडल्यामुळे उपायुक्त माधुरी मडावी यांनी सदर नालीवर बांधण्यात आलेल्या रपटा तोडून नाली साफ करण्याचे निर्देश यावेळी दिले. नालीवर असलेले संपुर्ण अतिक्रमण काढण्याचे सक्त निर्देश यावेळी अतिक्रमण विभागांला देण्यात आले. रस्त्यावर कचरा टाकणा-या दुकानदारावरही कार्यवाही करण्याच्या सुचना संबंधीतांना देण्यात आल्या. सदर नालीतील गाळ त्वरीत उचलण्यासाठी गाडी बोलविण्यात आली. सदर कार्यवाहीमुळे नाली संपुर्ण साफ करण्यात आली. यावेळी उपायुक्तांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाला सुचना केल्या की नाली बांधत असतांना योग्य ते नियोजन करणे गरजेचे आहे. नियोजन न केल्यामुळे भविष्यात अडचणी निर्माण होतात.

# नवीन शैक्षणिक धोरणानुसार नवीन अभ्यासक्रम लागू करण्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी- प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे प्रतिपादन

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी स्तरावर नवीन अभ्यासक्रम २०२४-२५ पासून लागू करावयाचे असून त्याकरीता शिक्षकांना प्रशिक्षण देण्याकरीता कार्यशाळा महत्वाची ठरणार असून शिक्षकांनी नवीन अभ्यासक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. या धोरणाची माहिती विद्यार्थी व पालकांपर्यंत पोहचवावी, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी अभ्यासक्रमाकरीता २०२४-२५ या शैक्षणिक सत्रापासून



विद्यापीठाव्दारे नवीन अभ्यासक्रम लागू केल्या जाणार आहे. हा अभ्यासक्रम लागू करण्याकरीता त्याची संपूर्ण माहिती शिक्षकांना मिळावी, यासाठी प्रशिक्षण देण्याकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठासह पाचही जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांमध्ये एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार विद्यापीठातील दृकश्राव्य सभागृहामध्ये अमरावती जिल्ह्याकरीता १६ जुलै, २०२४ रोजी प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली, त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषणातून मार्गदर्शन करतांना बोलत होते. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठातील मानवविद्याशाखेच्या अधिष्ठाता तथा मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडुल, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, ब्राजलाल बियाणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिपक धोटे, मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. मो. अतिक यांची उपस्थिती होती. डॉ. ढोरे पुढे म्हणाले, ३४ वर्षानंतर १९८६ नंतर नवीन शैक्षणिक धोरण आपल्याला मिळाले आहे. २०२३-२४ पासून शैक्षणिक धोरणाची पदव्युत्तर व स्वायत्त महाविद्यालयांमध्ये अंमलबजावणी करण्यात आली. यावर्षीपासून पदवी स्तरावर नवीन शैक्षणिक धोरण लागू होत आहे. चारही विद्याशाखेंतर्गत ही प्रशिक्षण कार्यशाळा पाचही जिल्हातील शिक्षकांसाठी होत असल्यामुळे नवीन अभ्यासक्रमा ची अंमलबजावणी करण्यासाठी सुलभ होणार आहे. या प्रशिक्षण कार्यशाळेचा विद्यार्थी, पालकांपर्यंत याची माहिती सर्व शिक्षकांनी पोहचवावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

# शासकीय विभागांनी अल्पसंख्याकांसाठी असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी

## – विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

### अल्पसंख्याकांसाठी असलेल्या विविध योजनांचा आढावा

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** केंद्र व राज्य शासनाव्दारे अल्पसंख्याकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची संबंधित शासकीय विभागांनी प्रभावी अंमलबजावणी करुन पात्र लाभार्थ्यांना विहित वेळेत लाभ मिळवून द्यावेत, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी दिले.



विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत अल्पसंख्याकांसाठी असलेल्या विविध शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक योजनांचा आढावा विभागीय आयुक्तांनी आज घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. उपायुक्त (सामान्य प्रशासन) संजय पवार, समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त सुनील वारे, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे उपायुक्त दत्तात्रय ठाकरे, नियोजन विभागाचे विशेष कार्य अधिकारी सुशील आग्रेकर, तंत्रशिक्षण विभागाचे सहाय्यक संचालक मनोज अंधारे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे सहाय्यक संचालक आर. एम. लोखंडे, शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे सहाय्यक संचालक अनिल कोल्हे, नगरविकास विभागाचे सहाय्यक संचालक श्यामकांत मस्के, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयाचे प्रतिनिधी आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, अमरावती विभागातील सर्व शासकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती पात्र अल्पसंख्याक लाभार्थ्यापर्यंत पोहोचवून त्यांना योजनांचा लाभ मिळवून दिला पाहिजे. अल्पसंख्यांक युवक-युवतींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्या साठी त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांच्यात सकारात्मक बदल घडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असे विभागीय आयुक्तांनी यावेळी सांगितले.

अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेली मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना, मुलींसाठी असलेली बेगम हजरतमल योजना यासह कौशल्य विकास विभाग, शिक्षण विभाग, व्यवसाय शिक्षण विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती संबंधितांना होण्यासाठी मुस्लिमबहुल वस्त्यांमध्ये व्यापक जनजागृती करावी.यावेळी शालेय शिक्षण, क्रीडा, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, कौशल्य विकास, नगर विकास, सामाजिक न्याय विभाग आदी विभागाव्दारे अल्पसंख्यांक समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा सविस्तर आढावा विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांनी घेतला व मार्गदर्शक सूचना केल्या.त्या पुढे म्हणाल्या की, शिक्षण विभागाने अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांची गळती रोखून त्यांची शिष्यवृत्तीची प्रकरणे मंजूरीसाठी शासनाकडे पाठवावीत. अल्पसंख्याकांच्या वस्तीमध्ये चांगले रस्ते, वीज, पाणी, शाळा, आरोग्य केंद्र, अंगणवाडी केंद्र आदी मूलभूत व पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. बेरोजगारांसाठी रोजगार मेळाव्यांचे नियमितपणे आयोजन करून त्यांना रोजगार उपलब्ध करुन द्यावेत. मदरस्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. पोलीस विभागाने जातीय सलोखा राखण्यासाठी जातीय सलोखा समिती व मोहल्ला समितीच्या सभा व बैठका घेऊन संबंधितांना मार्गदर्शन करावे, अशा सूचनाही यावेळी केल्या.

# पाठक सुभेदार लग्न सोहळ्यात भरड धान्याचे पदार्थ

## सरकारने मिलेटला श्री धान्य म्हणून केले नामकरण







**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** सोमवार दिनांक १५ जुलै च्या शुभमुहूर्त मुक्ताई पॅलेस अमरावती येथे संपन्न झालेल्या चि सौ कां देवयानी पाठक अमरावती व चि सूराग सुभेदार पुणे विवाह मध्ये मीलेट अर्थात भरड धान्याचे पदार्थ ठेवून त्याचे महत्त्व पटवून देण्याचा एक सामाजिक प्रयत्न करण्यात आला. या दोन्ही पदार्थाला लग्न सोहळ्यात आलेल्या पाहुण्यांनी चांगलीच पसंती दिली.

संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी खात्याने मागील वर्ष म्हणजे २०२३ हे मिलेट वर्ष जाहीर केले होते. भारतामध्ये विविध भागांमध्ये विविध प्रकारचे मिलेट चे उत्पादन होते. सरकारने मिलेटला श्री धान्य म्हणून नामकरण केले आहे. जगभर गाजलेल्या स२० संमेलनाची देखील भारताने सर्व देश प्रमुखांना मिलेट चे पदार्थ खाऊ घातले होते. मिलेट हा भारतीय अर्थव्यवस्था, कृषी व्यवस्था मजबूत करणारा तसेच विषमुक्त अन्न प्रदान करणारा संकल्प म्हणून स्वीकारला आहे. सध्या अनेक स्वास्थ्य जागरूक लोक मिलेट चे पदार्थ आपल्या दैनंदिन जीवनात स्वीकारत आहेत.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागामध्येकोदू व कुटकी ही भरडधान्य मोठ्या प्रमाणात होतात. मेळघाट ची ही उत्पादने लोकप्रिय व्हावी व तसेच तेथील स्थानिक शेतकऱ्यांना रोजगार प्राप्त व्हावा या उद्देशाने. तसेच लग्न सोहळ्यास आमंत्रित पाहुण्यांना उत्तम गुणवत्तेचे पौष्टिक मूल्य असणारे भरड धान्याची ओळख व्हावी या उद्देशाने श्री सुनील व सौ कांचन पाठक यांनी आपल्या लेकीच्या म्हणजे विवाह सोहळ्यात एक विशेष मिनिट स्टॉल आयोजित केला होता यामध्ये स्थानिक मेळघाट हाट मधून खरेदी केलेल्या मिलेटची खिचडी व मिलेटचा हलवा हे पदार्थ ठेवण्यात आले होते. अश्या प्रकारची मागणी आमच्याकडे प्रथमच आली त्यामुळे आमच्याकडेही या प्रमाणात कोदू व अन्य धान्य उपलब्ध नव्हते ते विशेष मेळघाट मधून मागवून, कुटून साफ करून तयार करण्यात आले असे मेळघाट हाट च्या संचालकांनी सांगितले. दोन्ही पदार्थ तयार करण्यासाठी नैवेद्यम चे संचालक श्री पराग छांगाणी व अंकुश उमप यांनी सहकार्य केले.

# नांदगावचे आयटीआय ठरले विभागात उत्कृष्ट

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर :** येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला अमरावती विभागातून उत्कृष्ट आयटीआय पुरस्कार प्राप्त झाला आहे. मुंबई येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नावीन्यपूर्ण योजना प्रशिक्षणासाठी आवश्यक सोयीसुविधा, १०० टक्के प्रवेश करणे, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांच्या कल्याणाकरिता विविध उपक्रम राबविणे, स्मार्ट क्लासरूम, सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून निगराणी, खेळाचे मैदान, प्रशिक्षणार्थीकरिता जिम, शुध्द पाण्याची व्यवस्था, यासह अनेक सुविधा प्राचार्य नंदनसिंह भूकवाल यांच्या मार्गदर्शनात उपलब्ध केल्यामुळे कौशल्य विभागातर्फे नांदगाव खंडेश्वर आयटीआयला विभाग स्तरावरून प्रथम पुरस्कार मुंबई येथे दिला आहे.यावेळी केंद्रीय सामाजिक न्यायराज्यमंत्री रामदास आठवले, कौशल्य, रोजगार, उद्योजकता मंत्रीमंगलप्रभात लोढा, कौशल्य विभागाच्या आयुक्त निधी चौधरी, संचालक दिगंबर दळवी आदींच्या उपस्थितीत या आयटीआयला हा विभागस्तरावरून प्रथम पुरस्कार प्रदान केला. यावेळी नांदगाव खंडेश्वर आयटीआयचे प्राचार्य नंदनसिंह भूकवाल, स्थानिक आयटीआयचे माजी शिल्पनिदेशक तथा मोझरीचे गटनिदेशक निरंजन मुरादे, शिल्प निदेशक राजेंद्र उन्होणे, दीपक गिरी, संदीप तिरमारे, चिन्मय दहाट यांची उपस्थिती होती. हा पुरस्कार प्राप्त होताच संस्थेचे शिल्प निदेशक तुषार जैन, निलेश देऊळकर, राम इखार, सुशील सरोदे, सागर डांगे, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, शहजाद खान, सचिन वाहणे, रिना जुनघरे, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगीता विवेकर, दीपाली लोखंडे, कर्मचारी अनंत खेडकर, नीलेश खंडार, मनोज पकडे, राजकुमार कांबळे, गौरव मोगरे, रवि लेंडे, संगीता राऊत, सुरक्षारक्षक धीरज तायडे, जयेश काटोलकर, धर्मदीप राणेकर यानी कौतुक केले आहे.

# मिठ्ठू नाल्याचे पाणी घरांमध्ये घुसले; साहित्याचे नुकसान



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक कापूसतळणी –** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कापूस तळणीच्या मिठ्ठू नाल्याला पूर आल्याने तेथील १५ ते २० रहिवाशांच्या घरांतील संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाले. या नाल्याचे खोलीकरण व नारायणपूरकडे जाणाऱ्या पुलाचे बांधकाम अर्धवट असल्यामुळे हीघटना घडल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. मंगळवारी दुपारी १ वाजता पावसाला सुरुवात झाली. तासाभरात गावाच्या मध्यभागातील मिठ्ठू नाल्याला मोठा पूर आला.

या पुराचे पाणी मेन रोडने घुसून गाडगेबाबा परिसरातील नागरिकांच्या घरात घुसले. यामध्ये मोहन मेश्राम यांचे शिवण क्लास केंद्र आणि माधव काळे, सतीश काळे यांच्या घरात पाणी शिरले. यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसल्याचे प्राथमिक उघड झाले. मिठ्ठ नाल्याला पश्चोट शेत शिवारातून म्हणजेच २५ किमी. अंतरावरून पाणी वाहात येते. या नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण झाल्याने आणि नारायणपूरकडे जाणारा पूल अतिशय लहान व कमी उंचीचा असल्यामुळे पाणी जोराने वाहून जाऊ शकत नाही. त्यामुळे गाडगेबाबा परिसरातील मेन रोडने पाणी घुसून नागरिकांच्या घरात घुसले. यामुळे घरांतील अन्नधान्याची नासाडी झाली.

### २००७ ची आठवण ताजी

सन २००७ मध्ये १८८ नागरिकांच्या घरात पाणी घुसले होते. त्याबद्दल शासनाने पूग्रस्त कुटुंबांना सानुग्रह मदत म्हणून पाच हजार रुपये दिले होते. त्यानंतर आतापर्यंत चार वेळा नागरिकांच्या घरात पाणी घुसले आहे. परंतु कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका आहे. मंगळवारीसुद्धा नेमके तसेच झाले.

# उपायुक्त माधुरी मडावी यांनी पाचही झोनच्या तिन्ही स्वच्छता कंत्राटदारांना बजावली नोटीस

## करार रद्द करून ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्याचा दिला इशारा



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** शहरातील अस्वच्छता, अनियमित कचरा संकलनासह करारातील अटी–नियमांचे उल्लंघन करणारे पाचही प्रभागातील तिन्ही स्वच्छता कंत्राटदार श्री नागरी सेवा सहकारी संस्था (झोन क्र. १ व ५), श्री गोविंदा सेवा सहकारी संस्था (झोन क्र.२ व ४) व क्षितिज बेरोजगारांची सेवा सहकारी संस्थेला (झोन क्र. ३) स्वच्छता विभागाची सूत्रे नुकतीच हाती घेणाऱ्या उपायुक्त प्रशासन क्र. १ माधुरी मडावी यांनी मंगळवारी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. दोन दिवसांपासून शहरातील स्वच्छतेचा आढावा घेणाऱ्या उपायुक्तांना स्वच्छतेतअनेक उणिवा आढळल्या. यात करारातील अटी–नियमांचे उल्लंघन होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. प्रत्येक प्रभागात आवश्यकतेनुसार सफाई कर्मचारी नाहीत, नियमितपणे प्रत्येक घरातून कचऱ्याचे संकलन होत नाही, नाल्या साफ केल्या जात नाहीत. नियमित फवारी, धुवारणी होतनसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी प्रत्येक प्रभागात १०० यानुसार २२ प्रभागांमध्ये २२०० स्वच्छता कर्मचारी असावेत, प्रत्येक घरातून नियमितपणे कचरा संकलन व्हावे, शहरातील नाल्यास्वच्छ कराव्यात, फवारणी, धुवारणी करावी,शहरातील स्वच्छतेची एकूणच वाईट स्थिती बघता ती सुधारण्यात यावी, असे कठोर निर्देश देत २०जुलैपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. सुधारणा झाल्या नाही तर आणखी कठोर कारवाई केली जाईल, असा कडक इशाराही नोटीसमध्ये देण्यात आला आहे.

### करार रद्द करून ब्लॅकलिस्टेड करणार

पाचही झोनमधील स्वच्छताकंत्राटदारांना नियमित कचरा संकलन, सफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्यासाठी २० जुलैपर्यंत मुदत दिली. त्यांनी करारातील अटी व नियमांचे पालन केले नाही तर त्यांचा करार रद्द करून ब्लॅकलिस्टेड करणार.

– माधुरी मडावी, उपायुक्त प्रशासन क्र. १

# दारूबंदीसाठी एकवटल्या गुरूदेवनगरच्या रणरागिणी: ग्रामसभेत ठराव मंजूर

## परिसरातील ८-१० ठिकाणी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे छापे



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक गुरूदेवनगर–** ग्रामपंचायत हद्दीत येत असलेल्या गुरूदेवनगर तसेच मंजुळामाता नगर परीसरात दारू, वरली–मटका, जुगार आदी अवैध व्यवसाय सुरू आहे. त्यामुळे येथील सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आले असून याविरुद्ध येथील महिलांनी मोहीम आखली आहे. त्या मोहिमेचीच फलश्रृती म्हणून आज, मंगळवारी येथे ग्रामसभा घेण्यात आली. या सभेत दारुबंदीचा ठराव पारित करण्यात आला. याकरीता महिला सरपंच वैशाली धुमोने, पोलीस उपनिरीक्षक सुरेश शिंदे, उपसरपंच मिलिंद काळमेघ, ग्रामसेवक विनोद खडसे, ग्रापं. सदस्य संदीप बारमासे यांनी पुढाकार घेतला. गावात मोठया प्रमाणात होत असलेली दारुविक्री बंद करण्यात यावी या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेत महिला, पुरुष व युवकांनी मोठया प्रमाणात हजेरी लावली. अवैध धंद्यांमुळे जेष्ठ नागरिक, विशेषत: महिला, शालेय विद्यार्थी तसेच सामान्यजण कमालीचे त्रस्त झाले आहे. यामुळे अनेकांचे संसारही उध्दवस्त होत आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी असलेल्या गुरूदेवनगरची ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यामुळेच ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला.

गेल्या अनेक वर्षांपासून गावात ठिक–ठिकाणी अवैध दारू विक्री, वरली मटका, जुगार, आदी व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालू आहे. दरम्यानच्या काळात तिवसा पोलिसांना गुरूदेवनगर हे गाव दारूमुक्त करण्यात यावे, असा ठराव पाठविण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी केवळ थातूर–मातूर कारवाई केली. परिणामी एक आठवडयानंतर पुन्हा अवैध धंदे फोफावले आहे. दरम्यान दररोज वाढत जाणाऱ्या या व्यवसायांमुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले असून आजचा ठराव त्वरेने अंमलात न आणल्यास भविष्यात रास्ता रोको आंदोलन केले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### म्हणून महत्वपूर्ण ठराव घेतला

गावातील अनेक तरुण व अल्पवयीन मुले दारूच्या आहारी जात आहेत. दुसरीकडे दारु विक्रेत्यांवर पोलीस प्रशासनाकडून ठोस कारवाई केल्या जात नाही. त्यामुळेच आजच्या ग्रामसभेत महिला व ग्रामस्थांच्या उपस्थितीत गावातील अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी, हा महत्वपूर्ण ठराव घेण्यात आला. – वैशाली धुमोने, सरपंच, गुरूदेवनगर.

### आठ, दहा विक्रेत्यांवर धाडी

आज सकाळी ११ वाजताचे दरम्यान राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पथक गुरुदेवनगरात धडकले. सरपंच वैशाली धुमोने, पोलीस पाटील तसेच ग्रापं. सदस्य, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष व अनेक महिला त्या पथकात सहभागी झाल्या. त्यानंतर हा ताफा येथील ८ ते १० दारूविक्रेत्याच्या घरी गेला. झाडाझडती घेतली असता पोलिसांना तेथे काही आढळून आले नाही. कारण संबंधितांनी त्यापूर्वीच योग्य तजवीज केली होती. तरीही पोलिसांनी दारु विक्रेते व त्यांच्या घरातील सदस्यांना पोलीसी भाषेत समज दिली. यावेळी पोलीस निरीक्षक सुरज दाभेराव, सहायक पोलिस निरीक्षक एकनाथ शेजळ, अश्विनी उबाळे, बजरंग थोरात, पंकज भारती, महेश महेशकर, चालक संजय देहाडे उपस्थित होते.

# खरीप हंगाम २०२३ राज्यस्तरीय पिक स्पर्धेचा निकाल जाहीर

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताकअमरावती,**

जिल्ह्यात पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांचा गौरव व्हावा, यासाठी पिक स्पर्धा राबविण्यात येतात. त्याअनुषंगाने खरीप हंगाम सन २०२३ चा राज्यस्तरीय पिकस्पर्धेचा निकाल नुकताच जाहिर करण्यात आला आहे. या पिकस्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील तूर आदिवासी गटामध्ये सुशिला मारूतराव युवनाते, महेंद्री ता. वरुड यांना व्दितीय क्रमांक तर आशिष सुरेश महाले, वाई खु. ता. वरुड यांना तृतीय क्रमांक मिळविला आहे. राज्यात खरीप हंगाम सन २०२३ मध्ये भात,




ज्वारी, बाजरी,मका,नाचणी, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या ११ पिकांसाठी पिकस्पर्धा आयोजन करण्यात आले होते. पिकस्पर्धेसाठी तालुका हा घटक आधारभूत धरण्यात येतो. शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत घेऊन राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील बक्षीसे देण्यात येतात. खरीप हंगाम सन २०२३ पिकस्पर्धेचे राज्यस्तरीय निकाल आयुक्त (कृषि) रविंद्र बिनवडे यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय पिकस्पर्धा निकाल समितीद्वारे जाहीर करण्यात आले. खरीप हंगाम सन २०२४ पिकस्पर्धेसाठी सर्वसाधारण गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रु. ३०० व आदिवासी गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रु. १५० प्रवेश शुल्क भरून पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेता येईल. स्पर्धेतसहभागी होण्याची अंतिम तारिख मुग व उडीद पिकासाठी ३१ जुलै २०२४ व भात, ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, सोयाबीन भुईमुग व सुर्यफुल या पिकासाठी ३१ ऑगस्ट २०२४ अशी आहे. अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा, असे आवाहन कृषि विभागाकडून करण्यात आले आहे.

# अमरावती महानगरपालिकेमार्फेत दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य साधनाचे वाटप

## सम्रग शिक्षा समावेशित शिक्षण अंतर्गत नाविण्यपुर्ण उपक्रमाचे आयोजन

### महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांची उपस्थिती

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अमरावती महानगरपालिका सम्रग शिक्षा समावेशित शिक्षण शिक्षण विभाग मार्फेत दिव्यांग विद्यार्थी यांना व्हिलचेअर, लो व्हिजन किट, लार्ज प्रिंट या साहित्य साधनाचा वाटप क्रार्यकम दि.१६ जुलै रोजी शींल सेवा, सुविधा क्रेंद्र, आयसोलेशन दवाखाना नवाथे नगर येथे करण्यात आले होते. या क्रार्यकमाचे अध्यक्ष श्रीमती माधुरी मडावी उपायुक्त (प्रशा), प्रमुख अतिथी श्री भुषण पुसतकर सहा.आयुक्त, श्री.डाँ. प्रकाश मेश्राम शिक्षणाधिकारी, श्री वहीद खान पठाण, श्रीमती संध्या वासनिक, कु.ज्योती बन्सोड शाळा निरीक्षक, श्री पंकजकुमार सपकाळ सहा.क्रार्यकम अधिकारी, कु. वंदना फुंदे मुख्याध्यापक म.न.पा.हिंदी शाळा क्र १२ नागपुरी गेट हे उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांचे स्वागत करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमात उपायुक्त माधुरी मडावी यांच्या हस्ते दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य साधन वाटप करण्यात आले. यामध्ये एकुण २३ दिव्यांग विद्यार्थ्यांना व्हिलचेअर, २४ विद्यार्थ्यांना लो व्हिजन किट याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कैलास कुलट व आभार प्रदर्शन उज्वल जाधव यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता श्री धिरज सावरकर समावेशित शिक्षण समन्वयक, श्री योगेश राणे, निजामुद्दीन काझी विषयतज्ञ, कु.दिपाली थोरात समावेशित




विषयतज्ञ श्री अतुल बोबडे, श्री विशाल वालचाळे, श्री मोरेश्वर चव्हाण विशेष शिक्षक, कु. सोनिया पवार, कु.भारती मालखेडे, कु. पुनम कणेर, प्रतिभा नागापुरे, कु. वैशाली सोळंके,कु.कुमीदीनी देवळे विशेष शिक्षिका यांनी परीश्रम घेतले.

यावेळी उपायुक्त माधुरी मडावी म्हणाले की, या दिव्यांग विद्यार्थ्यांना गरजेनुसार साहित्याचे वाटप करण्यात येते. शासनाचे दिव्यांगासाठी हे स्तुत्य उपक्रम असून शहरी भागातील विद्यार्थ्यांनी याचा पुरेपूर फायदा घ्यावा. तसेच दिव्यांगांना व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी व अर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. यावेळी शहरातील दिव्यांग विद्यार्थ्यांना महानगरपालिके तर्फे पुर्णपणे पाठपुरावा केला जाईल.

महानगरपालिका शिक्षण विभाग कार्यालयाकडे प्राप्त साहित्य वाटप यादीनुसार शहरातून बहुविकलांग, मतीमंद, कर्णदोष, सी.पी., अंध व अस्थिव्यंग असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आल्याची माहिती यावेळी अपंग विभागाकडून देण्यात आली, विद्यार्थ्यांना व्हिलचेअर, लो व्हिजन किट आदी गरजेच्या साधनांचे वाटप करण्यात आले,

# दीड हजारांच्या ओवाळणीसाठी सव्वालाख 'बहिणीं'चे आले अर्ज

## लाडकी बहीण योजनेसाठी ऑफलाइनवर अधिक भर, अर्जाचे होणार चावडी वाचन

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेला गेल्या पंधरा दिवसांत जिल्ह्यात मंगळवार, १६ जुलैपर्यंत १ लाख २४ हजार ३६७ महिलांनी अर्ज केले आहेत. आतापर्यंत जिल्ह्यात ऑफलाइन पद्धतीने ७३ हजार ७९५ अर्ज, तर ऑनलाइन पद्धतीने ५० हजार ५७२ असे एकूण १ लाख २४ हजार ३६७ अर्ज प्राप्त झाले आहेत. या योजनेमध्ये सध्या ऑफलाइन पद्धतीने मोठ्या प्रमाणावर अर्ज प्राप्त झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. प्रत्येक शनिवारी सर्व नोंद झालेल्या लाभार्थ्यांच्या नावांचे चावडी वाचन करून आक्षेप असल्यास पात्र, अपात्रतेबाबत गाव पातळीवरच खातरजमा करून तालुकास्तरावर समितीने अंतिम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. अर्ज घेण्यासाठी सर्व अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. मोहीम स्वरूपात योजनेच्या अंमलबजावणीसाठी शिबिराचे आयोजन करण्याबाबत महिला व बालकल्याण विभागाने नियोजन केले आहे. गावातील अथवा त्या त्या वॉर्डमधील सर्व पात्र लाभार्थ्यांचे ऑफलाइन पद्धतीने हार्ड कॉपी अर्ज अंगणवाडी सेविकांकडे जमा करण्यात येत आहेत. अर्जाची नोंद अंगणवाडी स्तरावर घेण्यात येत असून, त्याबाबतच्या नोंदी ऑनलाइन व ऑफलाइन असे दोन्ही मिळून आलेले अर्ज नोंदवहीत ठेवण्यात येत आहेत. गावातील प्राप्त झालेल्या सर्व ऑफलाइन अर्जाचे ऑनलाइन स्वरूपात अर्ज भरण्याकरिता ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, तसेच सेतू सुविधा केंद्रातील डाटा ऑपरेटर यांच्यामध्ये वाटप करण्यात येऊन ऑनलाइन फॉर्म भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. वेबवेस्ड प्लिकेशन लिंक तसेच डॅशबोर्डचा क्सेस लवकर प्राप्त झाल्यास कामात सुसूत्रता व अधिक गतिमान कामकाज होणार आहे. लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांच्या मार्गदर्शनात महिला बालकल्याण विभागाचे डेप्युटी सीईओ डॉ. कैलास घोडके यांच्या नेतृत्वात कामकाज केले जात आहे.



### अशी आहे अर्जाची जिल्ह्यातील आकडेवारी

अमरावती १०२३०, भातकुली ८३८६, अचलपूर ८७४७, अंजनगाव सुजी ५१२२, दर्यापूर ५५२६, चांदुर बाजार ७४५२, मोर्शी ६८८२, वरूड ४८७७, तिवसा ८१८६, चांदूर रेल्वे ५६९७, धामणगाव रेल्वे ५५९६, नांदगाव खंडेश्वर ११३६६, धारणी ९४२५, चिखलदरा ६१५८, अमरावती महापालिका क्षेत्र २०७१७.

# येणस ग्रामपंचायतचे तीन सदस्य अपात्र

## अपर जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश अपर आयुक्तांनी ठेवला कायम

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील येणस येथील ग्रामपंचायतचे तीन सदस्य अनुक्रमे रंजना चौधरी, शंकर इखार व दिपाली कणसे यांना पदावरून अपात्र ठरविण्यात आले

अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी १८ डिसेंबर २०२३ रोजी दिलेला आदेश अप्पर आयुक्तांनी कायम ठेवत तीनही सदस्यांना अपात्र ठरविले. या सदस्यांनी मालमत्ता कराचा भरणा विहित मुदतीच्या आत केला नसल्याने ग्रामपंचायत अधिनियम १४(१ ह) तरतुदीचा भंग केला, असा आरोप करून त्यांना सदस्य पदावरून अपात्र घोषित करण्यात यावे, अशी तक्रार अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे ग्रामपंचायत सदस्य कृष्णा कणसे यांनी केली होती. या प्रकरणात अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व बाबी तपासून मागणी बिल मिळूनसुद्धा या तिन्ही सदस्यांनी विहित मुदतीच्या आत कराचा भरणा केला नसल्याचे आढळून आले. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी १८ डिसेंबर २०२३ रोजीच्या आदेशान्वये या तीनही सदस्यांना अपात्र घोषित केले होते.अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाविरुद्ध या सदस्यांनी विभागीय अप्पर आयुक्तांकडे अपील दाखल ध्ये केले. अप्पर आयुक्तांनी संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन करून अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला आपात्रतेचा आदेश कायम ठेवला व तीनही सदस्यांना सदस्य पदावरून अपात्र ठरविण्याचा आदेश नुकताच पारित केला आहे.

# कर्मचाऱ्यांच्या कामबंदमूळे जिल्हाभरातील 'महसूल'ची कार्यालय ओस

## धारणीचे महसूल कर्मचारीही बंदमध्ये सहभागी

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती/धारणी**

कर्मचाऱ्यांच्या कामबंद आंदोलनामूळे जिल्हाभरातील महसूल विभागाची सर्व कार्यालये ओस पडली आहेत. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश वस्तानी यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी कलेक्ट्रेटच्या प्रांगणात ठिय्या दिला.तर मेळघाट मध्येही महसूल कर्मचारी संपत सहभागी झाले आहेत त्यामुळे नागरिकांची कामे रखडली आहेत.



जिल्ह्यातील सर्व तहसील व एसडीओ कार्यालय तसेच जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी कालबद्ध आंदोलनाद्वारे सोमवारपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. त्यामुळे महसूल विभागाची कामे खोळंबली आहेत. याशिवाय विविध कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांनी चकरा मारून परतावे लागत आहे. शिवाय शाळा महाविद्यालयाच्या प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांची अडचण निर्माण होत आहे.

याशिवाय लाडकी बहीण या योजनेच्या आवश्यक कागदपत्रे मिळण्यासही अडचण होत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. नागरिकांना आवश्यक उत्पन्नाचे दाखले, जातीचे प्रमाणपत्र, नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र, शासनाच्या विविध योजनेचे अनुदान वाटप, याशिवाय अन्य कामे खोळंबली आहे. जिल्हाभरातील सर्व महसूल कार्यालयात सध्या रिकाम्या टेबल, खूर्चा दिसत आहे.

# अबब..! १२ फुट अजगराने कुत्र्याला गिळले

## जे.बी.पार्क मधील नागरी वस्तीतील घटना



**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

धामणगाव रेल्व येथील नागरी वस्तीतील जे.बी.पार्क मधील नागरी वस्तीत महाकाय अजगराचे दर्शन झाले. तब्बल १२ फूट लांब आणि २० किलो वजनाचा अजगर आढळला. सर्पमित्रांना या प्रकरणाची माहिती मिळताच त्यांनी अजगराला जीवनदान दिले. मोठा कुत्रा गिळल्याने हा अजगर एक पासून निपचित पडलेला असावा, असा अंदाज सर्पमित्रांनी व्यक्त केला. दरम्यान संवेदनशील प्राणी मित्रांनी मृत कुत्र्यावर अंत्यसंस्कार करून भुत दयेचा पायंडा पाडला आहे.येथील नागरी वस्तीतील जे. बी. पार्क मध्ये एका घराच्या पाठीमागे मोठा साप निपचित पडल्याची माहिती सर्पमित्रांना स्थानिक रहिवासीनीदिली. त्यावरून सर्प मित्र करण शेंडे व बाबू शेंडे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तसेच विलंडलीफे इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे प्रोजेक्टअसोसिएट अंकांनहाल्डर यांनी हॅलो फॉरेस्ट यावर सूचना दिली. दरम्यान चांदुर रेल्वे वन विभाग कार्यालयातर्फे सर्प मित्र अशफाक शहा यांना पाचारण करण्यात आले. अजगराने मोठा कुत्रा अर्धवट गिळला होता. कुत्रा आकाराने मोठा असल्याने अजगराला संपूर्ण कुत्रा गिळता आला नाही व कुत्रा अजगराच्या जबड्यात फसला. अजगराने कुत्र्याची शिकार एक दिवसापूर्वी केल्याने कुत्रा अजगराच्या जबड्यात फुगला. त्यामुळे रेस्क्यू करणे अडचणीचे होते. पण अशफाक शहा व सोबतच्या सर्पमित्रांनी कौशल्य वापरून अजगराच्या जबड्यातील कुत्रा बाहेर काढला. एक भला मोठा कुत्रा अजगराने गिळलेला असल्याचे त्यानंतर समोर आले. वनविभागाचे वन रक्षक शिव राठोड, अंकुश खेकाडे व

तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. अजगराला पकडून वन- विभागाच्या ताब्यात देण्यात आले. वन परिक्षेत्र अधिकारी भानुदास मचार यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल किशोर धोत्रे व आदींनी त्या अजगराला सुखरूप जंगलात सोडले. तसेच संवेदनशील प्राणी मित्रांनी मृत कुत्र्यावर अंत्यसंस्कार करून भुतं दयेचा पायंडा पाडला आहे. इंडियन रॉक पायथन म्हणजेच भारतीय अजगर या प्रजातीचा हा साप शहरी वस्तीतही आढळल्याची नोंद असल्याची माहिती सर्पमित्र अशफाक शहा यांनी दिली. हरीण, कुत्रा मांजर तसेच अन्य छोटी जनावरे या अजगराचे खाद्य असते. हा अजगर बिनविषारी असला तरी त्याने मनुष्याला चावा घेतल्यास मनुष्याचा अवयव तुटू शकतो. त्यामुळे मृत्यू होण्याची शक्यता असते, असेही सर्पमित्रांनी सांगितले.

# पावसाळ्यात वीज यंत्रणा व वीज उपकरणापासून सावधगिरी बाळगावी

## महावितरणचे वीज ग्राहकांना आवाहन : २४ तास संपर्कासाठी कंट्रोल रूमची विशेष सेवा

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पावसाळ्याला सुरुवात झाली आहे. त्यामुळे महावितरणच्या विजेचा धोका लक्षात घेता ,या काळात वीज यंत्रणेपासून तसेच घरगुती वीज उपकरणापांसून सावधगिरी बाळगली तर होणारे वीज अपघात टाळता येणे शक्य आहे. असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.



अतिवृष्टी, वादळाने तुटलेल्या वीजतारा, विजखांब, रस्त्याच्या बाजूचे फीडर पीलर, रोहित्राच्या लोखंडी कुंपण, फ्यूज बॉक्स तसेच घरातील ओलसर असलेले विद्युत उपकरणे, शेतीपंपाचा स्वीचबोर्ड आदींकडे दुर्लक्ष केल्याने दुर्घटना होण्याची शक्यता अधिक असते. या दुर्घटना टाळता येणे सहज शक्य आहे. वीज वाहिन्यांवर झाडे पडल्याने कधीकधी वीजखांब वाकला जातो. परिणामी वीजतारा तुटण्याचे प्रकार घडतात. त्यात वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने अशा तुटलेल्या, लोंबकळणार्या वीजतारांपासून सावध राहावे. या तारांना हात लावण्याचा किंवा हटविण्याचा प्रयत्न करू नये. असा प्रकार निदर्शनास आल्यास वीज ग्राहकांनी जवळच्या महावितरण कार्यालयाला अवगत करावे.२४ तास संपर्कासाठी कंट्रोल रूमची विशेष सेवा

परिमंडळाअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील वीज ग्राहकांसाठी २४ तास सुरु असणार्या महावितरणचे सनियंत्रण कक्षातील ७८७५७६३८७३ भ्रमणध्वनी क्रमांक आणि यवतमाळ जिल्ह्याकरीता ७८७५७६३०९९ हे भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कोणत्याही कंपनीच्या लॅण्डलाईन किंवा मोबाईलद्वारे या क्रमांकावर वीजग्राहकांना माहिती देता येणार आहे. यासोबतच महावितरणने वीज ग्राहकांसाठी १९१२/१९१२०/ १८००२१२३४३५/१८००२३३३४३५ हे टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून दिलेले आहे.

**आपात्कालिन परिस्थितीत करण्यात येतो वीज पुरवठा बंद**

पूर किंवा अतिवृष्टीमुळे कोणत्याही क्षणी प्रतिकूल स्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्यास खबरदारीचा उपाय म्हणून महावितरणकडून ते रोहित्र किंवा त्या फिडरचा वीजपुरवठा तात्पूरता बंद करण्यात येतो.परिस्थिती सुस्थितीत होताच वीज पुरवठा सुरळीत करण्यात येतो.त्यामुळे अशा स्थितीत संभाव्य धोका टाळण्यासाठी नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**घरातील वीज उपकरणांची घ्या खबरदारी**

पावसाळ्यात घरातील स्वीचबोर्ड किंवा विजेच्या उपकरणांचा ओलाव्याशी संपर्क येणार नाही, याची खबरदारी घ्यावी. घरातील वीजपुरवठ्याला आवश्यक अर्थिंग केल्याची खात्री करून घ्यावी. घरात शॉर्टसर्किट झाल्यास मेनस्वीच तात्काळ बंद करावा. घरावरील दूरचित्रवाणीची डिश किंवा ॲण्टेना वीजतारांपासून दूर ठेवावे. ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नये. विजेचे स्वीचबोर्ड किंवा कोणत्याही उपकरणाला पाणी लागणार नाही, याची दक्षता घ्यावी.

विजेवर चालणारे सर्व उपकरणे स्वीचबोर्डापासून बंद करावे. विशेषतः टिनपत्र्याच्या घरात राहणार्या नागरिकांनी पावसाळ्यात अतिदक्ष राहून विजेपासून सुरक्षित राहण्यासाठी उपाययोजना कराव्यात. याशिवाय विजेच्या खाबांना जनावरे बांधू नयेत, त्यास दूचाकी टेकवून ठेऊ नयेत किंवा विद्युत खाबांना तार बांधून कपडे वाळत घालू नयेत, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुढील तीन दिवस पावसाची रिपरिप; पिकांसाठी पोषक : नऊ तालुक्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस



**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

यंदाचा ३८ टक्के पावसाळा संपला तरी नऊ तालुक्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस आहे. सध्या दोन दिवसांपासून हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होत आहे. आणखी तीन ते चार दिवस पावसाची रिपरिप कायम राहणार आहे. या पावसाने रखडलेल्या पेरण्या मार्गी लागल्या आहेत. पहिल्या टप्प्यात पेरणी झालेल्या पिकांच्या वाढीसाठी सध्याचा पाऊस पोषक ठरला आहे. जिल्ह्यात तीन दिवसांपासून हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होत आहे. पुढील तीन दिवसदेखील पावसाची रिपरिप सुरू राहणार आहे. या दरम्यान २४ तासांत विदर्भात काही ठिकाणीजोरदार ते अतिजोरदार पावसाचा अलर्ट भारतीय 'हवामान विभागाने दिलेला आहे. तसेच जिल्ह्यात बुधवारी ऑरेंज अलर्ट व त्यानंतर तीन दिवसयेलो अलर्ट दिलेला आहे. त्यामुळे सार्वत्रिक पावसाची शक्यता आहे. दरम्यान, शहरात तीन दिवसांत दोन वेळा मुसळधार पावसाने महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापनाची पोलखोल झालेली आहे. पेरणी व पिकांसाठी सध्या होत असलेला पाऊस पोषक आहे.

# आज संध्याकाळी शहरात निघणार १४ मोहर्रम जुलूस

## नया अकोला, वलगाव बडनेरा शहरात कडेकोट बंदोबस्त

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत आज १४ मोहर्रम जुलूस निघणार असल्याने पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी शहरासह विशेषतः नया अकोला, वलगाव बडनेरा शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात करण्याचा मास्टर प्लान तयार केला आहे. आयुक्तालयाच्या हद्दीत शहरपोलिस, एसआरपीफ कंपनीसह २५० होमगार्ड जवांनाचा कडेकोट बंदोबस्त राहिल. तसेच आयुक्तालयाच्या हद्दीत १६ पेट्रोलींग टीम गस्त घालणार आहे. १७ जुलै रोजी सकाळी ६ वाजता पासून शहरात बंदोबस्त तैनात झाल्या आहेत.

शहर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील १० पोलिस ठाण्याच्या हद्दीत एकूण मोहर्रमचे एकूण १४ जुलूस निघणार आहे. वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत ५, बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन सवारी काढण्याचेआयोजन करण्यात आले आहे. यासह गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ३ रॅली, कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत १ अशा प्रकारे मोहर्रम जुलूस निघणार असल्याने शहर पोलिसांनी कडेकोट प्रि बंदोबस्त तैनात केला आहे. आयुक्तालयाच्या दहा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रत्येक पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त राहिल. शहर पोलिसांच्या दिमतीला एसआरपीफची कंपनी, २५० होमगार्ड तैनात राहणार आहे. याशिवाय प्रत्येक पोलिस ठाण्यातील वाहनांसह आयुक्तालय स्तरावरून स्वतंत्र १६ पेट्रोलींग टीम तयार करण्यात आल्या आहे. नया अकोलावलगाव बडनेरासह शहरातील प्रत्येक भागात १७ जुलैला पहाटे ६ वाजता पासूनच बंदोबस्त तैनात राहिल.

# भाजप खासदार अनुप धोत्रे यांच्या निवडणुकीला हायकोर्टात आव्हान

## बारशीटाकळी तालुक्यातील मतदार गोपाल चव्हाण यांची याचिका

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

अकोला लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित खासदार अनुप धोत्रे यांच्या निवडणुकीविरुद्ध बार्शीटाकळी तालुक्यातील उमरदरी (पो. जनुना) येथील मतदार गोपाल चव्हाण यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. धोत्रे यांनी निवडणूक जिंकण्यासाठी भ्रष्ट व्यवहार केला. त्यामुळे त्यांची निवड रद्द करण्यात यावी, असे चव्हाण यांचे म्हणणे आहे.



लोकसभा निवडणूक लढणार्या उमेदवाराने त्याच्या निवडणुकीवर झालेल्या खर्चाचा हिशेब सादर करणे बंधनकारक आहे. यासंदर्भात लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ७७ मध्ये तरतूद करण्यात आली आहे. तसेच, उमेदवाराने निवडणुकीवर किती खर्च करायचा, याची मर्यादाही निश्चित असते. गेल्या लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय निवडणूक आयोगाने ९५ लाख रुपये खर्चाची मर्यादा निर्धारित केली होती. परंतु, धोत्रे यांनी या कायद्याचे पालन केले नाही. त्यांनी खर्चाची मर्यादा ओलांडली व एकूण खर्चाची माहितीही लपवून ठेवली.

धोत्रे यांनी निवडणूक निर्णय अधिकार्यांना सादर केलेल्या खर्चाच्या माहितीमध्ये स्वत: ८१ लाख १७ हजार १०२ रुपये व भारतीय जनता पार्टीने ६ लाख ५५ हजार ८३० रुपये खर्च केल्याचे सांगितले आहे. हा एकूण खर्च ८७ लाख ७२ हजार ९३२ रुपये होतो. मात्र, भारतीय जनता पार्टीने धोत्रे यांच्या प्रचारासाठी प्रत्यक्षात १ कोटी २४ लाख ६० हजार ५९० रुपयांच्या जाहिराती प्रसिद्ध केल्या. धोत्रे यांनी ही माहिती खर्चाच्या हिशेबात देणे आवश्यक होते, पण त्यांनी तसे केले नाही. त्यांनी ही माहिती दडवली. हा खर्च विचारात घेतल्यास त्यांनी खर्चाची मर्यादा ओलांडल्याचे स्पष्ट होते, असा दावा चव्हाण यांनी याचिकेत केला आहे. चव्हाणतर्फे ड. संदीप चोपडे कामकाज पाहणार आहेत.

# पूर्णा नदी काठावर अवतरी पंढरी भक्तांनी अनुभवला पंढरपूरचा आनंद

## माधान येथील पालखीचे काजळी देऊरवाडा येथे आगमन

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

चांदुर बाजारमधील माधान येथून काजळी देउरवाडा येथील पूर्णा नदीच्या काठावर वसलेल्या विठ्ठल रुख्मिणी मंदिरात बुधवार रोजी पालखीचे प्रस्थान झाले. यावेळी माधान, काजळी आणि देउरवाडा येथील भक्तांनी या पालखीचे जोरदार स्वागत केले. पूर्णा नदीच्या काठावर श्री संत गुलाबराव महाराज यांच्या पालखीचे पूजन करण्यात आले. यावेळी पूर्णा नदीकाठावर जणू पंढरीच अवतरली होती असे पाहायला मिळाले या वेळी भक्तांना पंढरपूरमधील आनंद अनुभवायला मिळाला.या वेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेखाताई ठाकरे यांनी देखील उपस्थिती दर्शवली या वेळी या पालखी सोहळ्याला माधान येथील भक्त गण , मोठ्या संख्येने उपस्थित होते. जन्मोत्सवात पांढऱ्या रंगाची वेशभूषा असलेल्या वारकऱ्यांसोबत बालगोपालांनी सुद्धा सहभाग नोंदविला होता. चिमुकल्यांनी टाळांचा गजर करीत पालखी सोहळ्यातील भजनामध्ये रंगले होते.





### टाळांचा गजर, दिंडीतून जन्मोत्सव साजरा

माधान येथील श्री संत गुलाबरावमहाराजांचा जन्म ६ जुलै १८८१ मध्ये नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोणी टाकळी येथे झाला. महाराजांचे बालपण माधान येथील मोहोड कुटुंबामध्येगेले. त्यांनी ३४ वर्षांच्या वयात १३४ ग्रंथ लिहिले आहे. अशा संताची भूमी माधान येथे त्यांचा जन्मोत्सव गेल्या १४१ वर्षांपासून माधानवासी साजरा करीत आहेत.यामध्ये तीर्थस्थापना, काकडा आरती, हरिपाठ, कीर्तन करून जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या जन्मोत्सवात गावकऱ्यांचे मोलाचेयोगदान लाभले. कार्यक्रमाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दर्शविला. त्या सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध उर्फ माधवराव मोहोड यांनी आभार मानले.

# विदर्भाचे प्रतिपंढरपुर असलेल्या कौंडण्यपूरात भाविकांची मांदियाळी

## रुख्मिणीच्या माहेरात दर्शनाची रिंग : कौडण्यपूरला पंढरीचे रूप

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक कौडण्यपूर**

विदर्भाचे प्रतिपंढरपूर म्हणून ओळख असलेले रुख्मिणीचे माहेर अमरावती जिल्ह्यातील कौडण्यपूर येथे आज आषाढी एकादशी निमित्ताने हजारो भाविकांची मांदियाळी जमली होती. पहाटे श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिरात अभिषेक व महाआरती करण्यात आली. विशेष म्हणजे आज आषाढी एकादशी निमित्त मंदिराच्या गाभाऱ्यात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. त्याचबरोबर पावसाळ्यात भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून मंदिर समितीच्या वतीने दर्शन रांगा सुद्धा तयार करण्यात आल्या



आहे. वर्धा नदीच्या तीरावर असलेल्या माता रुख्मिणीच्या मंदिरात विदर्भातून हजारो भाविकांची एकच गर्दी जमली होती. महाराष्ट्रातील पंढरपूरला पायदळ जाणारी सर्वात पहिली पालखी येथील असून दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक येथून विठ्ठलाच्या भूमीत दिंडी सोबत जातात. विशेष म्हणजे कोरोना काळात महाराष्ट्रातील मानाच्या नऊ पालख्यांमध्ये कौडण्यपूर च्या पालखीला मानाचे स्थान देण्यात आले होते. ज्या प्रमाणे आषाढी एकादशीला पंढरपूरात वारकऱ्यांची गर्दी राहते त्याचप्रमाणे विदर्भातील भाविक मोठ्या प्रमाणात एकादशीला कौडण्यपुरला दर्शनाला येतात, अनेक भाविक असे आहेत की ज्यांना पंढरपुरला जाणं शक्य होत नाही.ते कौडण्यपूरला विठल रुक्मिणीचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करतात.

**अमरावती विठ्ठल रुख्मिणी मंदिरात भक्तांची मांदियाळी**

अमरावती शहरातील अंबागेट परिसरात असलेल्या विठ्ठल रुख्मिणी मंदिरात आषाढी एकादशी च्या निमित्याने आज सकाळ पासूनच भक्तांच्या रंग पहावयास मिळाल्या. शहरातील अनेक भक्तांनी य ठिकाणी पोहचून विठ्ठल रुक्मिणी मातेच दर्शन घेतल. ज्या भक्तांना पंढरपूरला जाऊन विठ्ठल रुख्मिणी मतेच दर्शन घेणे शक्य नाही असे अनेक भाविक या मंदिरात येऊन दर्शन घेतात.

मंदिर समितीच्या वतीने आज सकाळीच विठ्ठल रुख्मिणी मातेला दुग्धा अभिषेक करण्यात आला त्यानंतर आरती करण्यात आली व नंतर नंतर भक्तांच्या दर्शना साठी मंदिर खुले करण्यात आले .

# डाव्या हाताला सलाईन, उजव्या हाताने उपचार; गडचिरोलीतील मलेरियाग्रस्त वैद्यकीय अधिकाऱ्याची अशीही रुग्णसेवा

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक गडचिरोली**

प्रशासकीय उदासीनता आणि अपुऱ्या वैद्यकीय सुविधेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील आरोग्यव्यवस्थेचे विदारक चित्र नवे नाही. अशात प्रतिकूल परिस्थितीतही काही वैद्यकीय अधिकारी अतिदुर्गम व नक्षलप्रभावित भागात निष्ठेने रुग्णसेवा करून आदिवासींसाठी देवदूत ठरत आहेत. याचा प्रत्यय १५ जुलैला भामरागड तालुक्यातील लाहेरीत आला. स्वत: मलेरियाग्रस्त असल्याने एका हाताला



सलाईन असताना दुसर्या हाताने उपचार करून कर्तव्यपूर्ती करतानाचे एका वैद्यकीय अधिकार्याचे छायाचित्र समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे.

डॉ. संभाजी देवराव भोकरे असे त्या वैद्यकीय अधिकार्याचे नाव आहे. मूळचे हिंगोलीचे रहिवासी असलेले डॉ.भोकरे हे गेल्या काही वर्षांपासून भामरागडसारख्या अतिदुर्गम व नक्षलप्रभावित सेवा बजावत आहेत. सध्या त्यांची नियुक्ती लाहेरी प्राथमिक आरोग्य केंद्रात आहे. गडचिरोली जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक मलेरिया रुग्ण आहेत. भामरागड तालुका अधिक प्रभावित आहे. डॉ.भोकरे यांनाही मलेरियाचे निदान झाले. त्यामुळे १५ जुलै रोजी त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातच स्वत:ला सलाईन लावून उपचार घेत होते. याचवेळी आदिवासी रुग्ण उपचारासाठी आले. यावेळी रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून बाह्य रुग्ण कक्षात खुर्चीत बसून डाव्या हाताला सलाईन घेत असलेल्या डॉ. भोकरे यांनी उजव्या हाताने त्यांची तपासणी करून प्रिस्क्रिप्शन लिहिले. स्वत: उपचार घेत असताना इतरांवर उपचार करणार्या डॉ. भोकरे यांनी दाखवलेल्या तत्परतेची सध्या चर्चा आहे.

# ट्रायबलची 'नीट', 'जेईई' मोफत प्रशिक्षण योजना कागदावरच

## वर्षभरापासून अंमलबजावणीच नाही; अधिकारी-कर्मचारीही अनभिज्ञ

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दहावीनंतर दोन वर्षांच्या कालावधीमध्ये नामवंत खासगी प्रशिक्षण संस्थेच्या साहाय्याने अभियांत्रिकी (जेईई) व वैद्यकीय (नीट) प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी योजना राबविण्यास शासनाने ८ जून २०२३ रोजी मान्यता दिली आहे. परंतु वर्षभरापासून ही योजना केवळ कागदावरच आहे. आदिवासी विकास विभागातील अधिकारी-कर्मचारीसुद्धा या योजनेविषयी अनभिज्ञ असून ४८० विद्यार्थी योजनेच्या लाभापासून अद्यापही मुकले आहेत.



आदिवासींच्या चळवळीत अग्रगण्य असलेल्या 'ट्रायबल फोरम' या संघटनेने सरकारला वारंवार पत्रव्यवहार करून नीट, जेईई पात्रता परीक्षेच्या तयारीकरिता योजना तयार करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन शासनाने योजना तयार केली होती. मात्र या योजनेची अद्यापही अंमलबजावणी झालेली नाही. आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या प्रत्येक अपर आयुक्त कार्यालय स्तरावर शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रम शाळा व एकलव्य मॉडेल निवासी शाळा येथील कोणत्याही एका शाळेमध्ये एक तुकडी वैद्यकीय व दुसरी अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा तयारी करण्यासाठी बनविण्यात येण्याची तरतूद आहे.

> 'नीट', 'जेईई' मोफत प्रशिक्षण योजना ही दोन वर्षांपूर्वीची आहे. राज्यस्तरावर अंमलबजावणी झाली नाही. परंतु नागपूर अपर आयुक्त कार्यालयासह काही ठिकाणी ही योजना राबविली गेली. मात्र आता नव्याने 'सेंटर फॉर एक्सलन्स' ही योजना शासनाच्या मान्यतेसाठी पाठविली असून त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी केली जाईल.
>
> **नयना गुंडे, आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक**

**अशी ठरविली प्रशिक्षणार्थ्यांची पात्रता**

१) प्रशिक्षणाचा लाभ घेतेवेळी उमेदवार त्याच वर्षी दहावी उत्तीर्ण असावा.

२) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

३) उमेदवाराची जमात राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादीत असणे आवश्यक. प्रवेशाच्या वेळी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र आणि सहा महिन्यांच्या आत कास्ट व्हॅलिडिटी आवश्यक.

४) प्रशिक्षणार्थी व कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लक्ष रुपयांपेक्षा कमी असावे, अशा अटी आहेत.

# शेतात बहरलं विठुरायाचं सुंदर रुप! शेतकऱ्याने भात शेतीत साकारली विठुरायाची १२० फूट प्रतिकृती



**दि. १७ विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

'चंद्रभागे स्नान! तुका मागे हैची दान!! पंढरीचा वारकरी! वारी चुकों नेदी हरी!! संत तुकाराम महाराजांनी या अभंगात वारीचं महत्व पटवून दिलं आहे. मराठी मनाला आस लावणारी पंढरीची वारी ही वारकऱ्यांसाठी आणि मराठी माणसासाठी खुप जिव्हाळ्याचा विषय आहे. पंढरीची वारी मराठी माणसाचा सांस्कृतिक स्वाभिमान आहे. आज आषाढी एकादशीच्या पर्वावर केवळ महाराष्ट्रच नव्हे तर इतर राज्यातून येणाऱ्या वैष्णावांचा मेळा पंढरपुरला भरतो. लाखो भाविक पांडुरंगाच्या दर्शनाची आतुरतेने वाट पाहत असतात. ज्या भाविकांना विठुरायाचं दर्शन लाभतं ते भाग्यवानच! पण ज्यांना पंढरपूर गाठता येत नाही त्यांनी काय करावं बरं? पुण्यातील एका इंजिनिअरने यावर मार्ग काढला. सध्या सोशल मीडियावर पुण्यातील एका विठ्ठल भक्ताचा व्हिडिओ समोर आला आहे. या शेतकऱ्याने केलेल्या कृतीचं सर्वांनीच तोंड भरून कौतुक केलं आहे.


आषाढी एकादशीनिमित्त पुण्यातील एका शेतकऱ्याने आपल्या शेतात चक्क विठुरायाची प्रतिकृती बनवली आहे. पुण्याच्या मुळशी गावातील या शेतकऱ्याने आपल्या शेतात भात रोपाच्या साहाय्याने १२० फूट उंच विठ्ठलाची प्रतिकृती साकारल्याचं पाहायला मिळत आहे. पेश्याने इंजिनिअर असणाऱ्या शेतकऱ्याची कलाकृती नेटकऱ्यांना प्रचंड आवडली आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये या शेतकऱ्यासह गावातील काही ग्रामस्थ विठुरायाचं दर्शन घेताना दिसत आहेत. व्हिडिओमध्ये भातरुपी विठ्ठलाची प्रतिकृती पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी केली आहे. दरम्यान, हा व्हिडिओ जुना असल्याची माहिती मिळत आहे.

एक्सच्या प्लॅटफॉर्मवर हा व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. भातशेतीच्या रोपापासून विठ्ठलाचं देखणं रूप साकारून मुळशीच्या या शेतकऱ्याने नेटकऱ्याचं लक्ष वेधलं आहे. व्हिडिओवर जय श्री विठ्ठल जय हरि विठ्ठल अशी कमेंट एक यूजरने केली आहे तर आणखी एकाने राम कृष्ण हरी म्हणत आपली प्रतिक्रिया दिली आहे.

# बनावट अपंगत्व प्रमाणपत्रासाठी वापरले बनावट रेशन कार्ड, पूजा खेडकर यांचा आणखी एक कारनामा समोर

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक वाशीम**

भारतीय नागरी सेवेतील प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर (झेक्षर घहशवज़री) यांचे नवनवे कारनामे सातत्याने समोर येत आहेत. बनावट अपंगत्व प्रमाणपत्राच्या आधाराने त्यांनी सरकारी नोकरी बळकावल्यानंतर आता आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. पूजा खेडकर यांनी खोटा पत्ता आणि बनावट रेशन कार्ड वापरून अपंगत्व प्रमाणपत्र मिळवलं होतं, असं वृत्त इंडिया टुडेने दिलं आहे.



पूजा खेडकर यांनी यशवंतराव चव्हाण मेमोरिअल हॉस्पिटलमध्ये प्लॉट नंबर ५३, देहू आळंदी, तळवडे हा पत्ता सादर केला असून पिंपरी चिंचवडमधील त्यांचे निवासस्थान असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र या पत्त्यावर निवासी मालमत्ता नसून थर्मोवेरिटा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे. ही कंपनी आता बंद झाली आहे.या कंपनीच्या पत्त्याचा वापर करून बनावट रेशनकार्ड तयार करण्यात आल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होत आहे. याच पत्त्याचा वापर करून पूजा खेडकर यांनी लोकोमोटर अपंगत्वाचं प्रमाणपत्र मिळवलं आहे. २४ ऑगस्ट २०२२ रोजी जारी करण्यात आलेल्या प्रमाणपत्रात त्यांना गुडघ्यात सात टक्के अपंगत्व असल्याचं नमूद करण्यात आलं होतं.


**बनावट पत्त्यावर कारचीही नोंदणी**

केवळ बनावट अपंगत्व प्रमाणपत्रच नव्हे तर थर्मोवेरिटा कंपनीच्या नावावर ऑडी कारचीही नोंदणी करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड पालिकेच्या कर संकलन विभागानुसार या कंपनीवर गेल्या तीन वर्षांपासून २.७ लाख रुपये थकीत आहेत.

# शंभरावर अधिकाऱ्यांची वारी मेळघाटातील जनतेच्या दारी! लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी एक वेगळा प्रयत्न : सौरभ कटियार

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

मेळघाटातील विविध समस्या जाणून घेऊन ग्रामस्थ आणि प्रशासन यांच्यातील दरी कमी करण्यासाठी, त्याचबरोबर किरकोळ समस्यावर तिथेच मात करण्यासाठी आणि महत्वाच्या समस्या प्रशासनाच्या लक्ष आणून देण्यासाठी जिल्हाधिकारी सौरभ कटियार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांच्या



अध्यक्षतेखाली एक दिवस मेळघाटासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शंभर अधिकारी यांचे पथक मेळघाटात जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटियार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांनी दिली.

मेळघाट मधील ज्या विविध समस्या आहेत त्या सोडवण्यासाठी शासन पातळीवर अनेक प्रयत्न करण्यात येतात. परंतु काही बाबी राहून जातात किंवा काही बाबी पूर्ण होत नाहीत. वेगेगळ्या विभागांचे वेगवेगळे अधिकारी मेळघाटात पाठविले आणि त्यांच्याकडून ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्यास निश्चित त्यावर काही भरीव उपाययोजना करता येतील. हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यासाठी वेगवेगळ्या दहा विभागातील शंभर अधिकाऱ्यांचे पथके तयार करून शंभर गावांमध्ये पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे पथक गावातील समस्या जाणून घेईल, गावांमधील वेगवेगळ्या संस्थांना भेटी देईल. त्याचबरोबर गाव मधील वेगवेगळ्या समस्या आहेत त्या कशा सोडवायच्या हे जाणून घेतील.नंतर जिल्हाधिकारी यांना हे अहवाल सादर करतील. यातून एखादा चांगला उपक्रम राबवता येईल असे मत जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केले.

### या विभागांचे अधिकारी जाणार

१. महसूल विभाग - तहसीलदार २.ग्राम विकास विभाग- गट विकास अधिकारी ३.महिला बालविकास विभाग - बाल विकास प्रकल्प अधिकारी ४.ग्रामीण पाणीपुरवठा विभाग- उप अभियंता ४.शिक्षण विभाग - गट शिक्षण अधिकारी ५.पशु संवर्धन विभाग - पशुधन विकास अधिकारी ६.बांधकाम विभाग - उप अभियंता ७.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - उप अभियंता ८.कृषि विभाग विभाग -विस्तार अधिकारी ९.जिल्हा परिषद -विभाग प्रमुख

यासाठी या सर्व अधिकारी यांना संपर्क अधिकारी डॉ कैलास घोडके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस यांनी ट्रेनिंग दिली आली असून गावामध्ये कोणत्या विभागांच्या कोणत्या बाबी बघायच्या यावीही अवगत करण्यात आले आहे. यानंतर अधिकारी परत आल्यानंतर जिल्हाधिकारी यांना आपला अहवाल सादर करतील. यामधून निश्चितच सकरात्मक बाबी होतील अशी अपेक्षा आहे.

मेळघाटातील समस्या जाणून घेण्यासाठी एकाच दिवशी शंभर अधिकाऱ्यांचे पथके मेळाटात जात आहेत.एक दिवस मेळघाटासाठी या अभिनव उपक्रमातून निश्चितच चांगल्या बाबी पुढे येतील आणि आम्हाला त्याच्यावर उपाययोजना करता येतील. अशी माहिती सौरभ कटियार जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिली.